
म. ग्रं. ठाणे
विषय काव्य
सं. नं. ९९०३
स्थान ९९२३

सज्जनवृंदें मनामाजि आधी वदावा ॥ — एकनाथ

# यान-रत्न-

पुस्तक पहिलें.



**मंदारमाला.**

अत्यादरें लोक–कल्याण व्हाया जिला टाविलें त्र्यंबकानें शिरीं
तीरीं जिच्या संत झाले, तयांचा अपूर्ण ... अन्य देशांतरीं
**श्री शारदेच्या महाराष्ट्र–पुत्रां** सदा ... राजांकावरी
आली स्वयें गौतमाच्या तपें जी असे तीच ही माय **गोदावरी!**

संग्राहक व प्रकाशक

REFBK-0002328 ...त सराफ, नांदेड (...)

[ ... आठ आणे.

Bhujanga Ramrao A... ... Godavari ... Nanded.

# अर्पण.



श्लोक (मंदाक्रांता)

आर्ये! माला बुधजानिं तुला अर्पिल्या शारदेला
त्यांची संख्या अमित परि त्यां त्वां दिलें मान्यतेला
तैसा माझा जननि! लघुसा यत्न हा मान्य व्हावा
सत्कार्थी या निज पद-रता त्वां यशोलाभ द्यावा

---

## अनुक्रमणिका.


| | | |
|---|---|---|
| १ | नारदाची गादी (प्रकाशकाचें हृद्गत.) | १—५ |
| २ | प्रस्तावना (ले. कविभूषण बळवंत गणेश खापर्डे.) | ६—८ |
| ३ | मंगलाचरण (संतकवि दासगणू.) | ९ |
| ४ | कविपरिचय. | १० |
| ५ | वत्सलाहरण (चूडामणि—सुत) | १—१० |
| ६ | श्री अहल्याबाई होळकर (सं. दासगणू.) | ११-३० |
| ७ | श्री जयदेव-चरित्र (रुक्मांगद-सुत.) | ३१-३८ |


---


आख्यान-रत्न-माला. वर्षांतून ६ पुस्तकें. पृ. ४८ किं. ८ आणे. १ रु.
प्रवेश फी भरणारास पाउणपट किं. एकदम ६ पुस्तकांची किं. प्र. फी. सह ३। रु.

ग. अ. सराफ, नांदेड. (निजाम)

# अर्पण.



श्लोक (मंदाक्रांता)

आर्ये! माला बुधजनिं तुला अर्पिल्या शारदेला
त्यांची संख्या अमित परि त्यां त्वां दिलें मान्यतेला
तैसा माझा जननि! लघुसा यत्न हा मान्य व्हावा
सत्कार्यीं या निज पद-रता त्वां यशोलाभ द्यावा

---

## अनुक्रमणिका.


| | | |
|---|---|---|
| १ | नारदाची गादी (प्रकाशकाचें हृद्गत.) | १—५ |
| २ | प्रस्तावना (ले. कविभूषण बळवंत गणेश खापर्डे.) | ६—८ |
| ३ | मंगलाचरण (संतकवि दासगणू.) | ९ |
| ४ | कविपरिचय. | १० |
| ५ | वत्सलाहरण (चूडामणि-सुत) | १—१० |
| ६ | श्री अहल्याबाई होळकर (सं. दासगणू.) | ११-३० |
| ७ | श्री जयदेव--चरित्र (रुक्मांगद--सुत.) | ३१-३८ |


---


आख्यान-रत्न-माला. वर्षांतून ६ पुस्तकें. पृ. ४८ किं. ८ आणे. १ रु.
प्रवेश फी भरणारास पाऊणपट किं. एकदम ६ पुस्तकांची किं. प्र. फी. सह ३। रु.

ग. अ. सराफ, नांदेड. (निजाम)

ग्रा. क्र. २३२८
REFBK-0002328

# नारदाची गादी.

**आदौ कीर्तन प्रारंभीं**— जनीजनार्दनास प्रेमभावानें प्रणाम करून, पूर्वपरंपरेप्रमाणें हृद्गताचें **निरूपण** करणें अवश्य आहे. मात्र हें **निरूपण** सर्वाधार अशा सच्चिदानंद **परब्रह्माचें** नसून, आह्मीं आरंभिलेल्या सत्कार्यास आधारभूत असलेल्या **कारणब्रह्माचें** आहे. या निरुपणांत (१) मालेचा उद्देश, (२) तिची आवश्यकता व महत्व, (३) तिचें स्वरुप व घटना, (४) तिची अपरिहार्य परिस्थिति, (५) आणि तिचा अल्पारंभ इत्यादि गोष्टींविषयीं आह्मीं आपले विचार प्रथमतःच प्रगट करणें प्रशस्त वाटल्यावरून ते क्रमानुसार सादर करितों.

(१) **मालेचा उद्देश**—प्रथम मालेच्या उद्देशासंबंधानें लिहूं. कीर्तनोपयोगी प्रसिद्ध कवितांचा संग्रह करून, तो यथाकाल प्रसिद्ध करावयाचा; तसेंच विद्यमान् कवी व कवियित्रींचीं मनें, सर्वांगानें उपयुक्त अशा कीर्तनसंस्थेकडे वळवून परिस्थित्यनुरूप देवभक्तांचीं चरित्रें वर्णन करण्याला त्यांस प्रोत्साहन द्यावयाचें; आणि तद्वारां यथाशक्त्या कीर्तनविषयक वाङ्मयाची उणीव अंशतः तरी भरून काढावयाची; हा या मालेचा उद्देश आहे.

(२) **आवश्यकता व महत्व**—दुसरा विचार मालेची आवश्यकता व तिचें महत्व या संबंधाचा होय. उद्देशांतील 'अप्रसिद्ध कवितांचा संग्रह,' आणि 'परिस्थित्यनुरूप देवभक्तांचीं चरित्रें,' या दोन्हीं गोष्टींची स्पष्टता या विचारानेंच व्हावयाची असल्यामुळें, तो थोडासा विस्तारानें लिहिणें भाग आहे, पण त्या पूर्वीं कीर्तनविषयक वाङ्मयासंबंधों दोन शब्द लिहिल्यास ते प्रकृत विचारास साधनीभूत होतील असें वाटेत.

कोणत्याहि भाषेंतील वाङ्मयाचा विचार पद्धतशीर रीतीनें होणें, हें तिच्या परिणत स्वरूपाचें द्योतक आहे. हें स्वरूप मराठी भाषेला यावयास किती काळ लागेल, हें सध्यांच कांहीं सांगवत नाहीं. त्यांतून कीर्तनविषयक वाङ्मयाविषयीं तर बोलावयासच नको. कारण कीर्तनपरंपरेचें ऐतिहासिक पर्यालोचन ज्यांत केलें आहे, असा एकहि ग्रंथ आतांपर्यंत निर्माण झालेला दिसत नाहीं. जोपर्यंत तसला ग्रंथ निर्माण होणार नाहीं, तोपर्यंत तद्विषयक वाङ्मयाची संपूर्ण अभिवृद्धि होईल, ही आशा करण्यांत अर्थ नाहीं. सध्यांचें नवयुग चिकित्सेचें आहे, हें नव्यानें सांगणें नको. कोणत्याहि धार्मिक परंपरेला—सांप्रदायाला इतिहासाचें पाठबळ असेल तरच ती परंपरा चिरंजीवी होण्याचा सध्यां संभव आहे. उपलब्ध असलेलें कीर्तनविषयक गद्य वाङ्मय, या दृष्टीनें समाधानकारक नाहीं; हें कबूल करणें भाग आहे. तथापि निराश न होतां, यापुढें तरी, कीर्तन हीहि एक लोकशिक्षणाची उपयुक्त शाखा असल्यामुळें ऐतिहासिक दृष्टीनें तिचा यथायोग्य अभ्यास करून सुशिक्षित धार्मिकांनीं-विशेषतः कीर्तनकारांनीं तिचें खालावलेलें स्वरूप दूर करण्याचा चिकाटीनें प्रयत्न करणें अवश्य आहे.

वरील इषारा भावि वाङ्मया संबंधानें झाला; पण उपलब्ध अशा अप्रसिद्ध वाङ्मयाची वाट काय? कित्येकांच्या मतें, हें असलें वाङ्मय–जुनें वाङ्मय भाषेच्या दृष्टीनें अशुद्ध असेल, त्याचें स्वरूप ऐतिहासिक नसेल, अथवा क्वचित तसें असूनहि प्रस्तुत तें उपयुक्त हि नसेल, तर त्याला जागच्या जागीं 'राम,' म्हणूं देणेंच इष्ट आहे. परंतु हें मत अत्यंत अनुदारपणाचें आहे, असें आह्मांस वाटतें. त्याचीं कारणेंहि संक्षेपतः सांगतों. भाषेच्या शुद्धाशुद्धतेचा प्रश्न कांहीं बिकट नाहीं. 'पंचतंत्राचें मराठी भाषांतर, ऐतिहासिक बखरी, कागदपत्रें, आणि त्यांवरून लिहिलेले इतिहास पाहूं जातां, भाषा ही कालपरत्वें बदलत जाते; ही गोष्ट निर्विवाद आहे. दुसरें असें कीं, एकाच कालांत प्रांतांप्रांतांत एकाच भाषेचीं निराळीं स्वरूपें आढळतात. तिसरी आणि महत्वाची गोष्ट ही कीं, भाषेचें शुद्ध स्वरूप ज्या **'व्याकरणावर'** अवलंबून असावयाचें त्यांतच ग्रंथकाराला **जुना वर्तमानकाळ** व **नवा वर्तमानकाळ,** असे प्राचीन वाङ्मयाचें महत्व जाणून भाषेचे दोन्हीहि शुद्ध प्रकार यावे लागतात. यावरून एखादा गद्य किंवा पद्य ग्रंथ केवळ प्रचलित भाषेच्या मानानें, जुन्या व अपरिचित म्हणून अशुद्ध वाटणाऱ्या भाषेंतील असल्यास तो प्रकाशित होणें इष्ट नाहीं, असें मत ज्यांनीं निश्चित केलें असेल, त्यांना प्रथमच आमची नम्र पण अगत्याची सूचना आहे. ती ही कीं, भाषेनें अशुद्ध व मात्रादोषांनीं परिपूर्ण असे ऐतिहासिक कागदपत्र, पोवाडे, लावण्या यांचा संग्रह करून तयार केलेले ग्रंथ, ज्यांनीं वाङ्मयाच्या अभिवृध्यर्थ अत्यंत आस्थेनें व परिश्रमानें प्रकाशत केले, त्यांच्याविषयीं आपलेपणाच्या भावनेनें निदान यापुढें तरी कृतज्ञताबुद्धि धारण करावी.

असो. दुसरा प्रश्न ऐतिहासिक स्वरुपाचा. कीर्तनाविषयक वाङ्मयाला इतिहासाची कसोटी लावूं पाहणारांची तर आमच्या मतें इतिहासाविषयींची फार संकुचित कल्पना आहे. शाळेंतून शिकविल्या जाणाऱ्या इतिहासांत ज्या ज्या गोष्टींचा उल्लेख असतो, त्याच काय त्या घडलेल्या व खऱ्या, आणि बाकीच्या साऱ्या भाकडकथा; अशी यांपैकीं कित्येकांची समजूत असते. प्रस्तुत अशा लोकांकरितां कांहीं सांगावयाचें नसून, ज्यांची इतिहासाबद्दलची बुद्धि थोडीशी तरी व्यापक आहे, त्यांच्याकरितां तत्संबंधीं आमची सामान्य कल्पना व्यक्त करितों.

इतिहास म्हणजे (इति + ह + आस) असें निश्चयानें झालें--घडलें म्हणून सांगरणारा ग्रंथ, हा त्याचा धात्वर्थ जितका व्यापक आहे, तितका प्रत्यक्ष वस्तुस्थितींत--ग्रंथांत उतरणें केव्हांहि शक्य नाहीं. शिवाय ज्या समाजाचा किंवा राष्ट्राचा इतिहास लिहावयाचा, त्यांतील चांगल्या आणि वाईट व्यक्तींच्या अनुक्रमें महत्वाच्या सद्गुणांचें व दुर्गुणांचें, व शेवटीं त्यांच्या परिणामाचें हि शब्दचित्र रेखाटावयाचें; आणि आलेल्या प्रसंगाला तोंड देऊन, झालेल्या चुका पुनःपुन्हां न होऊं देतां, दुर्गुणांचा

---

१ रा. रामभाऊ जोशी आपल्या 'मराठी भाषेची घटना' या पुस्तकांत लिहितात कीं, "तुकारामाची भाषा त्याच्या कालानुरूप शुद्ध आहे...... ...आज आपल्याला अशुद्ध असे प्रयोग आढळले तर ते त्याच्या वेळीं लोकांच्या उपयोगांतच असावेत." भाग ४ था. पृ. २२३.

परित्याग व सद्गुणांचा परिपोष करण्याकरितां पुढील पिढीला प्रवृत्त करावयाचें, हाच इष्ट व मुख्य हेतु कोणत्याहि इतिहासकाराच्या मनांत असावयास पाहिजे. चिकित्सेनें सत्यासत्याची निवड करतांना भावि पिढीनें चांगली तेवढीच विशिष्ट दिशा स्वीकारावी, हें दाखविण्याकडे इतिहासकाराला काना-डोळा करून चालावयाचेंच नाहीं. एवंच कुठल्याहि सद्गुणांचें ग्रहण व दुर्गुणांचा परित्याग हाच भाग इतिहासाचें महत्व मानण्यांत विशेष आहे. असें नसतें तर ज्याला श्रेष्ठ संस्कृति नाहीं, प्राचीन परंपरा नाहीं, अशा भूपृष्ठावरील एखाद्या मानवी समूहाला अखेरपर्यंत आपल्या उर्जितावस्थेची आशाच बाळगण्याचें कारण पडलें नसतें. परंतु, स्वतःच्या समाजाचें सामर्थ्य दाखवून, दुसऱ्याचे दुर्गुण दिग्दर्शित करणारा एकदेशी इतिहासकार सोडला तरी, सद्गुणांचा स्वीकार व दुर्गुणांचें दूरीकरण हाच ज्याचा अंतिम हेतु, अशा कोणत्याहि इतिहासकाराला वरीलसारख्या जनसमूहानें आपल्या इतिहासाचें अनुकरण केल्याबद्दल अभिनंदनपूर्वक अभिमान व आनंदच वाटेल! यावरून सद्गुणाचें समर्थन व दुर्गुणाचा धिःकार हेंच इतिहासाचें इष्ट कार्य ठरतें. हें कार्य न करतां नुसतें इति--ह--आस एवढेंच सांगणाऱ्या इतिहासानें आजपर्यंत कोणाचेंहि कल्याण झालें नाहीं व पुढेंहि होणें शक्य नाहीं.

आतां इतिहासाप्रमाणें काव्याचेंहि साध्य काय आहे, व त्या उभयतांची एकवाक्यता कोणत्या बाबतींत होऊं शकते, हें पाहणें ओघानेंच प्राप्त झालें आहे. तेव्हां तेंहि थोडक्यांत पाहूं.

इतिहास म्हणजे 'सत्य,' व काव्य म्हणजे 'सत्याभास' अशी जरी या उभयतांची विरोधा—भासात्मक व्याख्या क्वचित आढळून येते, तरी परिणामाच्या दृष्टीनें त्यांचें परस्पर ऐक्यच आहे हें थोड्याशा विचारांतीं दिसून येईल. इतिहासकाराला घडलेल्या गोष्टींवरून ज्या कांहीं सद्गुणाचें समर्थन करावयाचें असतें, तेंच समर्थन घडलेल्या अथवा कल्पित कथानकावरून थोड्याशा--क्वचित् बऱ्याचशा अतिशयोक्तीनें कविहि आपल्या काव्यांत करीत असतो. इतिहास आणि काव्य यांचें पर्य-वसान याच ऐक्यांत आहे. कीर्तनाचें आतांपर्यंतचें उपलब्ध व प्रसिद्ध, संस्कृत प्राकृत, पद्य वाङ्मय सामान्यतः अशाच ऐक्यानें परिपूर्ण आहे.

इतिहास आणि काव्य यांचें हें ऐक्य ज्यांना मानवतें त्यांच्यापुढें, 'रामायण' व 'महाभारत' हे दोन्हींहि ग्रंथ आदर्शवत् असून पहिल्यास काव्य व दुसऱ्यास इतिहास अशी संज्ञा कां मिळाली असा बिकट प्रश्न जरी कोणीं उपस्थित केला तरी त्या प्रश्नानें इतिहास--संशोधकाप्रमाणें त्यांचा बुद्धि--भेद होण्याचें कारणच उरत नाहीं. यावरून इतिहास--संशोधनाला आम्हीं गौण समजतों, असें समजूं नये. उलट काव्यप्रेमी मनुष्यानें--निदान अर्वाचीन कालांत तरी ऐतिहासिक चिकित्सेचा शक्य तितका अवलंब केला पाहिजे. मग त्या संशोधनानें **राम-रावण, धर्मराज-दुर्योधन** यांच्या नांवांची कदाचित् उलटापालट झाली तरी चिंता नाहीं. परंतु शेवटीं अनैतिक व असच्छीलाचा परित्याग करून नैतिक व सच्छील चारित्राचाच पक्ष धारण करणें योग्य व हितावह होय. एवंच कीर्तनविषयक वाङ्मयाला इतिहासाचा असावा तसा पाठिंबा नसून त्याचा सर्वस्वीं भर काव्यावर आहे, अशी कल्पना करून घेणारांनीं वरील इतिहास व काव्य यांच्या पर्यवसानांतील ऐक्याच्या विवेचनाचा विचार केल्यास मालेचें महत्व व तिची आवश्यकता त्यांच्या दृष्टिपथांत आल्या

वांचून राहणार नाहीं.

आतां तिचें **स्वरूप** व **घटना** या संबंधीं लिहूं. आमच्या जाहिरपत्रकावरून मालेसंबंधीं कित्येकांनीं निरनिराळ्या कल्पना करून घेतल्या आहेत; असें आतांपर्यंतच्या पत्र व्यवहारावरून म्हणावें लागतें. 'प्रति दोन महिन्यास,' या शब्दांवरून कित्येकांनीं मालेला द्विमासिक पुस्तक म्हणून कल्पिलें आहे. 'मुंबईचें कीर्तन मासिक' या उल्लेखावरून तेंच मासिक पुस्तक मोंगलाईंत पुढें चालूं होणार, असें कोणीं मानिलें आहे. मात्र यांपैकीं कोणींहि 'कीर्तन' मासिकाकडे असलेल्या वार्षिक वर्गणींतून प्रवेशफी वजा करण्याचें कळविलें नाहीं; हें त्यांनीं बरेंच केलें. कोणीं श्री **.दासगणू** म. ची आख्यानें एकदमच मालेंत येणार आहेत अशी समजूत करून घेतली आहे. यासंबंधानें आम्ही आमच्या उदार आश्रयदात्यांस असें कळवितों कीं, माला हें एखादें नियत कालिक नसून संबंध दाखवणाऱ्या गद्यासह पद्यांचा संग्रह स्वतंत्र पुस्तकरूपानें प्रकाशित करण्याचें एक साधन आहे. हिच्यांतील आख्यानें, इतिहास, काव्य, उत्तेजन, कवितासंग्रह अशा निरनिराळ्या दृष्टींनीं येतील. या प्रमाणें क्रमाक्रमानें ४८ पानांचें एक, अशीं वर्षांतून निदान सहा पुस्तकें आपल्या सेवेंत सादर केलीं जातील.

मालेच्या **अपरिहार्य परिस्थितीचा** विचार तर मुख्यतः आमच्या प्रांताबाहेरील बंधुभगिनी करितांच करावयाचा. आरंभशूर म्हणून अगोदरच दाक्षिणात्यांची दुष्कीर्ति. त्यांत आम्ही तर जाणून बुजून मोंगलाईंतले. त्यांतल्या त्यांत वाङ्मयाविषयींची विपत्ति तर विचारूंच नये! मासिक पुस्तकें, वर्तमानपत्रें यांचा या प्रांताला अगदींच परिचय नाहीं असें नाहीं. पण तो परिचय म्हणजे कसा? एकाएकीं उदय व्हावयाचा, थोडासा विजय संपादन करावयाचा; आणि 'अतिपरिचयादवज्ञा' होईल म्हणून कीं काय शक्य तितक्या लौकर लयाच्या मार्गाला लागावयाचें. '**जातस्यहि ध्रुवोमृत्यु ध्रुवं जन्ममृतस्यच**' हा धर्म क्षेत्रांत–कुरु क्षेत्रांत उगम पावलेला सिद्धांत आमच्या मागसलेल्या (?) मोंगलाईप्रांतांतील वाङ्मयक्षेत्रांत जितकी मुलतानी गाजवतो, तितकी तो कोठेंच गाजवित नाहीं. असली ही अपरिहार्य परिस्थिति आमच्या प्रांतीय बंधूंच्या पूर्ण परिचयाची असल्या मुळें त्यांच्या करितां तिचें नुसतें दिग्दर्शन पुरें होईल. तें करून वार्षिक वर्गणीच्या मोहानें नियत कालिकाच्या नादांत पडून लोकांना आपण होऊन अविश्वासास अवसर न देतां, आम्हीं मुद्दाम मालेचें कार्य हातीं घेतलें आहे.

**मालेचा अल्पारंभ**–'अल्पारंभःक्षेमकरः' याप्रमाणें आम्हीं मालेला आरंभ तर केला. आरंभिलेलें कार्य न सोडणें, हें उत्तमाचें; विघ्नाच्या विचारानें सोडणें, हें मध्यमाचें लक्षण आहे, असें सांगणाऱ्या भर्तृहरींचें '**प्रारभ्यतेन खलु विघ्नभयेन नीचैः**' हें वाक्य, कार्य करण्याची नुसती इच्छा बाळगणाऱ्यास कटु लागतें, हें खरें; पण त्याचा विचार केल्यास तें आळशास आरंभशूर व आरंभशूरास कर्मवीर बनवितें. हें जाणून व '**कां न सदन बांधावें कीं त्यामाजी विळे करिल घूस**' ही मयूर–वाणी लक्षांत घेऊन केलेला मालेचा अल्पारंभ ईश्वराच्या आशीर्वादानें व उदार आश्रयदात्यांच्या आश्वासनानें यशस्वी होवो! एवढीच सदिच्छा कळवितों.

काव्य ८०४०

**आभार प्रदर्शन**—केवळ शब्दानेंच कृतज्ञतेची फेड करण्याच्या रूढ प्रचारानें कोणासहि साह्यकर्त्यांचें उतराई होतां येणें शक्य नाहीं. परंतु अंतःस्फूर्तीची स्पष्टता शब्दावलंबी असल्यामुळें आम्हीहि कर्तव्य म्हणून त्याच मार्गाचा अवलंब करितों. प्रथमतः ज्यांच्या आशीर्वादपूर्वक आश्वासना वांचून मालेचें काम जनतेपुढें येऊंच शकलें नसतें त्या हरिदास मुकुटमणि व काव्यकोविद संतकवि **श्री. दासगणु** महाराजांचे आभार मानितों. मोगलाईंत एका नवीनच व महत्वाच्या कार्यास आरंभ झालेला पाहून, ज्यांनीं आपला अमोल वेळ खर्च केला व आपल्या प्रेमळ व प्रौढ प्रस्तावनेनें प्रस्तुत पुस्तकालाच नव्हे तर मालेच्या पुढील प्रयत्नालाहि महाराष्ट्रीयांच्या परमादराकरितां पात्रता आणून दिली त्यांचे–**'साहित्य–संघाचे'** संस्थापक व उमरावतीच्या **'उदय'** पत्राचे संपादक श्री. कविभूषण **बळवंत गणेश खापर्डे** यांचे–आम्ही फारफार आभारी आहों. तसेंच विश्वासानें ज्यांनीं प्रवेशफीच केवळ नव्हे तर सहा पुस्तकांचीहि किंमत अगाऊच देऊन मालेला आश्रय दिला, व आतां पर्यंत मान्यतापूर्वक मौन स्वीकारून मार्गप्रतीक्षा केली, त्या **आश्रयदात्यांचे,** व असे उदार आश्रयदाते मिळवून देण्याचे कामीं खटपट करणाऱ्या सर्व **सद्गृहस्थांचे** आम्ही मनापासून आभार मानितों. मालेला साह्य करणें हें कर्तव्यांतच दाखल आहे, असें जरी असलें तरी, तें कर्तव्य बजावून यापुढेंहि साह्य करण्याचें आश्वासन दिल्याबद्दल आमच्या येथील **'कीर्तनसंस्थे'** च्या चालकांचे आभार मानल्यावांचून आमच्यानें राहवत नाहीं. शेवटीं,

**सगुण चरित्रें परम पवित्रें हरिचीं वर्णावीं**
**सज्जनवृंदें मनोभावें आधीं वंदावीं**

या आमच्या गोदातीरस्थ **नाथ महाराजांच्या** आज्ञेप्रमाणें आम्हीं केलेला संकल्प ॥ **सत्य संकल्पाचा दाता नारायण** ॥ पूर्ण करो! असें म्हणून संतशिरोमणी तुकाराम–महाराजांच्या शब्दांत प्रभूची प्रार्थना करितों.

**अभंग.**

| | | |
|---|---|---|
| हेंचिदान दे गा! देवा! | तुझा विसर न व्हावा | १ |
| **गुण गाईन** आवडी | होचि माझी सर्व जोडी | २ |
| नलगे मुक्ति, धनसंपदा | **संत–संग** दे गा! सदा | ३ |
| **तुका** म्हणे गर्भवासीं | सुखें घालावें आम्हांसी | ४ |

**नांदेड** (निजाम स्टेट.)
गणेशचतुर्थी शके १८४५

महाराष्ट्रीयांचा नम्र.
**गणेश अनंत सराफ**
प्रकाशक.

वांचून राहणार नाहीं.

आतां तिचें **स्वरूप** व **घटना** या संबंधीं लिहूं. आमच्या जाहिरपत्रकावरून मालेसंबंधीं कित्येकांनीं निरनिराळ्या कल्पना करून घेतल्या आहेत; असें आतांपर्यंतच्या पत्र व्यवहारावरून म्हणावें लागतें. 'प्रति दोन महिन्यास,' या शब्दांवरून कित्येकांनीं मालेला द्विमासिक पुस्तक म्हणून कल्पिलें आहे. 'मुंबईचें कीर्तन मासिक' या उल्लेखावरून तेंच मासिक पुस्तक मोंगलाईंत पुढें चालू होणार, असें कोणीं मानिलें आहे. मात्र यापैकीं कोणींहि 'कीर्तन' मासिकाकडे असलेल्या वार्षिक वर्गणींतून प्रवेशफी वजा करण्याचें कळविलें नाहीं; हें त्यांनीं बरेंच केलें. कोणीं श्री **दासगणू** म. ची आख्यानें एकदमच मालेंत येणार आहेत अशी समजूत करून घेतली आहे. यासंबंधानें आम्ही आमच्या उदार आश्रयदात्यांस असें कळवितों कीं, माला हें एखादें नियत कालिक नसून संबंध दाखवणाऱ्या गद्यासह पद्यांचा संग्रह स्वतंत्र पुस्तकरूपानें प्रकाशित करण्याचें एक साधन आहे. हिच्यांतील आख्यानें, इतिहास, काव्य, उत्तेजन, कवितासंग्रह अशा निरनिराळ्या दृष्टींनीं येतील. या प्रमाणें क्रमाक्रमानें ४८ पानांचें एक, अशीं वर्षांतून निदान सहा पुस्तकें आपल्या सेवेंत सादर केलीं जातील.

मालेच्या **अपरिहार्य परिस्थितीचा** विचार तर मुख्यतः आमच्या प्रांताबाहेरील बंधुभगिनी करितांच करावयाचा. आरंभशूर म्हणून अगोदरच दाक्षिणात्यांची दुष्कीर्ति. त्यांत आम्ही तर जाणून बुजून मोंगलाईंतलें. त्यांतल्या त्यांत वाङ्मयविषयींची विपत्ति तर विचारूंच नये! मासिक पुस्तकें, वर्तमानपत्रें यांचा या प्रांताला अगदींच परिचय नाहीं असें नाहीं. पण तो परिचय म्हणजे कसा? एकाएकीं उदय व्हावयाचा, थोडासा विजय संपादन करावयाचा; आणि 'अतिपरिचयादवज्ञा' होईल म्हणून कीं काय शक्य तितक्या लौकर लयाच्या मार्गाला लागावयाचें. **'जातस्यहि ध्रुवोर्मृत्यु ध्रुवं जन्ममृतस्यच'** हा धर्म क्षेत्रांत–कुरु क्षेत्रांत उगम पावलेला सिद्धांत आमच्या मागास–लेल्या (?) मोंगलाईप्रांतांतील वाङ्मयक्षेत्रांत जितकी सुलतानी गाजवतो, तितकी तो कोठेंच गाजावित नाहीं. असली ही अपरिहार्य परिस्थिति आमच्या प्रांतीय बंधूंच्या पूर्ण परिचयाची असल्या मुळें त्यांच्या करितां तिचें नुसतें दिग्दर्शन पुरें होईल. तें करून वार्षिक वर्गणीच्या मोहानें नियत कालिकाच्या नादांत पडून लोकांना आपण होऊन अविश्वासास अवसर न देतां, आम्हीं मुद्दाम मालेचें कार्य हातीं घेतलें आहे.

**मालेचा अल्पारंभ**–'अल्पारंभःक्षेमकरः' याप्रमाणें आम्हीं मालेला आरंभ तर केला. आरंभिलेलें कार्य न सोडणें, हें उत्तमाचें; विघ्नाच्या विचारानें सोडणें, हें मध्यमाचें लक्षण आहे, असें सांगणाऱ्या भर्तृहरीचें **'प्रारभ्यतेन खलु विघ्नभयेन नीचैः'** हें वाक्य, कार्य करण्याची नुसती इच्छा बाळगणाऱ्यास कटु लागतें, हें खरें; पण त्याचा विचार केल्यास तें आळशास आरंभशूर व आरंभशूरास कर्मवीर बनवितें. हें जाणून व **'कां न सदन बांधावें कीं त्यामाजी विळें करिल घूस'** ही मयूर–वाणी लक्षांत घेऊन केलेला मालेचा अल्पारंभ ईश्वराच्या आशीर्वादानें व उदार आश्रयदात्यांच्या आश्वासनानें यशस्वी होवो! एवढीच सदिच्छा बाळगितों.

क्रमांक ८०६०



**आभार प्रदर्शन**—केवळ शब्दानेंच कृतज्ञतेची फेड करण्याच्या रूढ प्रचारानें कोणासहि साह्यकर्त्याचें उतराई होतां येणें शक्य नाहीं. परंतु अंतःस्फूर्तीची स्पष्टता शब्दावलंबी असल्यामुळें आम्हीहि कर्तव्य म्हणून त्याच मार्गाचा अवलंब करितों. प्रथमतः ज्यांच्या आशीर्वादपूर्वक आश्वासना वांचून मालेचें काम जनतेपुढें येऊंच शकलें नसतें त्या हरिदास मुकुटमणि व काव्यकोविद संतकवि **श्री. दासगणु** महाराजांचे आभार मानितों. मोगलाईंत एका नवीनच व महत्वाच्या कार्यास आरंभ झालेला पाहून, ज्यांनीं आपला अमोल वेळ खर्च केला व आपल्या प्रेमळ व प्रौढ प्रस्तावनेनें प्रस्तुत पुस्तकालाच नव्हे तर मालेच्या पुढील प्रयत्नालाहि महाराष्ट्रियांच्या परमादराकरितां पात्रता आणून दिली त्यांचे–'**साहित्य–संघाचे**' संस्थापक व उमरावतीच्या '**उदय**' पत्राचे संपादक श्री. कविभूषण **बळवंत गणेश खापर्डे** यांचे–आम्ही फारफार आभारी आहों. तसेंच विश्वासानें ज्यांनीं प्रवेशफीच केवळ नव्हे तर सहा पुस्तकांचीहि किंमत अगाऊच देऊन मालेला आश्रय दिला, व आतां पर्यंत मान्यतापूर्वक मौन स्वीकारून मार्गप्रतीक्षा केली, त्या **आश्रयदात्यांचे**, व असे उदार आश्रयदाते मिळवून देण्याचे कामीं खटपट करणाऱ्या सर्व **सद्गृहस्थांचे** आम्ही मनापासून आभार मानितों. मालेला साह्य करणें हें कर्तव्यांतच दाखल आहे, असें जरी असलें तरी, तें कर्तव्य बजावून यापुढेंहि साह्य करण्याचें आश्वासन दिल्याबद्दल आमच्या येथील '**कीर्तनसंस्थे**'च्या चालकांचे आभार मानल्यावांचून आमच्यानें राहवत नाहीं. शेवटीं,

**सगुण चरित्रें परम पवित्रें हरिचीं वर्णावीं**
**सज्जनवृंदें मनोभावें आधीं वंदावीं**

या आमच्या गोदातीरस्थ **नाथ महाराजांच्या** आज्ञेप्रमाणें आम्हीं केलेला संकल्प **॥ सत्य संकल्पाचा दाता नारायण ॥** पूर्ण करो! असें म्हणून संतशिरोमणी तुकाराम–महाराजांच्या शब्दांत प्रभूची प्रार्थना करितों.

**अभंग.**

| | | |
|---|---|---|
| हेंचिदान दे गा! देवा! | तुझा विसर न व्हावा | १ |
| **गुण गाईन** आवडी | होचि माझी सर्व जोडी | २ |
| नलगे मुक्ति, धनसंपदा | **संत–संग** दे गा! सदा | ३ |
| **तुका** म्हणे गर्भवासीं | सुखें घालावें आम्हांसी | ४ |

**नांदेड** (निजाम स्टेट.)
गणेशचतुर्थी शके १८४५

महाराष्ट्रियांचा नम्र.
**गणेश अनंत सराफ.**
प्रकाशक.

# प्रस्तावना.

इतिहासाच्या दृष्टीच्या टप्यांत काळ आला तेव्हां पासून हिंदुस्थानचीं अरण्यें पक्ष्यांच्या कूजि--तांनीं, व हिंदुस्थानचीं मंदिरें भक्तांच्या गायनांनीं, सतत सारखींच निनादित होत आलीं आहेत, अशी साक्ष इतिहास देतो. ही भूमीच धर्माचें रोपटें मूळ रुजवण्या करितां, व त्याचा वृक्ष बनवून त्याच्या शीतल छायेखालीं, स्वार्थीसाठीं भांडभांडून व एकमेकांस ओरबडून रक्तबंबाळ झालेल्या, व थकल्याभागलेल्या जगाला आणून वसविण्याकरितां देवानें निर्माण केली आहे, अशी अनेकांची श्रद्धा आहे, व माझीहि अल्पबुद्धीनें हीच समजूत आहे; आणि कीर्तनकारांस ही जगतांतील आर्य-भूमीच्या कार्याची कल्पना नीटपणें पटली असल्यावांचून व ती अंतःकरणांत जिवंतपणें संसार करीत असल्यावांचून, तीव्रपणें जाणवत असल्यावांचून, व ह्या कल्पनेनें त्यांचें अंतरंग व जीवित सर्वत्र सारखें उचंबळत असल्यावांचून **आजच्या काळचे** उत्तम हरिदास उत्पन्न होणें शक्य नाहीं असें मला वाटतें, व आजच्या मुख्य हरिदासांत मुख्य गुण जर कोणता पाहिजे असेल, तर तो माझ्या मतें हाच होय. वरील विधानांत म्हटलेला ' धर्म ' म्हणजे काय, तो कोणता, हा प्रश्न येथें उद्भवेल हें मी जाणून आहे. पण त्याचें सविस्तर उत्तर देण्याचें हें स्थान नव्हे हें उघड आहे. पण केवळ वर सांगितलेली कल्पना एकदां अगदीं थोडक्यांत तरी पुरी करून टाकण्याकरितां येथें एवढेंच सांगितलेलें पुरें कीं, आमचे आदिग्रंथ वेद, वेदांचें विचारदृष्ट्या सार म्हणजे उपनिषदें, व ' सर्वोपनिषदांचें ' यच्चयावत् आर्यसंस्कृतींत एकमात्र काढिलेलें सार म्हणजे श्रीमद्भगवद्गीता, अशा परंपरेनें गीता-प्रणीत " सांग व सपरिवार " कर्मयोग हा हिंदुस्थानचा मूळ राष्ट्रीय धर्म अशी माझी कल्पना आहे; व मॅझिनीनें म्हटल्याप्रमाणें प्रत्येक राष्ट्रास स्वतःचें असें कांहीं तरी संवर्धन करून जगताच्या व मानवजातीच्या भांडारांत अमोल व इतर सर्व भरींची पूर्ति करणारी भर म्हणून स्वतःचें असें जें कांहीं नेऊन टाकावयाचें तें म्हणजे हाच '**धर्म**' होय, अशीहि माझी समजूत आहे. ह्या कल्पनेनें अंतःकरण व्याप्त होऊन राष्ट्रभर कथा करीत हिंडणाऱ्या हरिदासांची हिंदुस्थानास आज अत्यंत गरज आहे; व या प्रस्तावनेचे हरिदास-वाचक ह्याचा विचार करितील अशी मला आशा आहे. ह्या कार्यांतील कार्यकर्त्यांस हिंदुस्थानचें व जगताचें, दोहोंचेंहि काम केल्याचें श्रेय व पुण्य देवाघरीं मिळणार आहे. हिंदुस्थानांत व जगभराहि, आज एक मोठा धार्मिक क्रांतीचा काळ येऊन पोंचला आहे, व म्हणूनहि खऱ्या चांगल्या हरिदासांची आज फार गरज आहे. जगताचा धर्मदाता जगताला येणार असेंहि भविष्य आहे, व ह्यावरूनहि आज चांगल्या हरिदासांची गरज सिद्ध होत आहे.

ह्या दृष्टीनें विचार करितां कीर्तनसंस्थेच्या उद्धाराचा जो जो प्रयत्न आज होईल तो तो हवाच आहे. किंबहुना आजच्या परिस्थितिकडे पाहून बोलावयाचें म्हणजे कीर्तनसंस्था आधीं 'जगवि-ण्याचा' जो जो प्रयत्न होईल तो तोहि हवाच आहे. **आपण ही संस्था कधींहि बुडूं देतां कामा नये. त्यांत मोठी राष्ट्रीय हानि आहे.** हिंदुस्थानच्या विशिष्ट संस्कृतीस अनुसरून त्या संस्कृतीच्या मुक्या पण भावनेच्छु जीवाला वाणीची जोड करून देणारे जे कांहीं विशिष्ट प्रचार ( Institutions ) हिंदुस्थानांत आहेत, त्यापैकीं कीर्तन हा एक महत्वाचा प्रचार किंवा ही एक

महत्वाची संस्था आहे. ज्याला आपण कीर्तन म्हणतों, **अशा तऱ्हेचा उपदेशाचा प्रकार अन्य कोणत्याहि देशांत निर्माण झाला आहे असें वाटत नाहीं**; व त्याचेंहि कारण हिंदुस्थानची विशिष्ट संस्कृतीच होय. शिवाय, **कीर्तनाप्रमाणें बहुजनसमाजाला उपदेश करण्याचें, निदान हिंदुस्थानांत तरी, दुसरें उत्कृष्ट साधन नाहीं.** आजहि उपलब्ध असलेल्या सर्व साधनांत हें उत्कृष्ट पैकींच साधन आहे.

अलीकडे ही परिस्थिति व कीर्तनाचें हें महत्व, लक्षांत आल्यामुळें ह्या संस्थेकडे किंवा प्रचाराकडे विचारी लोकांचें लक्ष दिवसेंदिवस सारखें अधिकाधिक वेधत चाललें आहे असें स्पष्ट दिसून येत आहे. अलीकडे **कीर्तन-संमेलन** कांहीं वर्षे भरत आहे व त्याचा अधिकाधिक उपयोगहि होत चाललेला दिसून येत आहे हें, त्या विषयाकडे थोडें बहुतहि लक्ष देऊन पहात असलेल्या वाचकास, वेगळें सांगण्याची गरज नाहीं. हें संमेलन हाहि प्रस्तुत पुस्तकाच्याच जातीचा एक पूर्वीचा व थोड्या वेगळ्या प्रकारचा पण तेंच ध्येय डोळ्यापुढें असलेला असा प्रयत्न होय. ह्या नंतर '**कीर्तन**' ह्या नांवाचें एक मासिकहि कांहीं दिवसपर्यंत ह्याच वर्गाकरितां अशाच प्रकारें काम आपल्या परिस्थितीच्या मानानें चांगल्या रीतीनें बजावीत होतें. पण दुर्दैवानें तें पुढें बंद झालेलें दिसतें. तें मासिकहि ह्याच प्रकारचा दुसरा एक प्रयत्न होय.

कीर्तनसंमेलनाचे बाबतींत जातां जातां इतकें सांगितल्या वांचून रहावत नाहीं कीं, अशा प्रकारचा हा पहिला प्रयत्न अगदीं प्रथम आमच्याच प्रांतात नागपूर शहरीं झाला, आणि हें सांगण्यास मला अभिमान वाटतो; व त्याहि नागपूरच्या प्रयत्नाचें श्रेय मुख्यतः खरोखरीं दे. भ. **डॉ. मुंजे** व त्यांचे एक दोन साह्यकर्ते ह्यांसच दिलें पाहिजे. खरोखरीं ह्या दृष्टीनें पहातां डॉक्टर साहेब हेच ह्या विषयाला अलीकडे योग्य दिशेनें चालन देण्याला कारणीभूत झालेले आहेत असें म्हटल्यानें कोणाचेंहि मन दुखावेल असें मला वाटत नाहीं; व ह्याच भावनेनें कृतज्ञतापूर्वक त्यांच्या नांवाचा येथें निर्देश केल्यावांचून माझ्यानें पुढें जावलें नाहीं.

त्यानंतरचा माझ्या पहाण्यांतला तरी, नांदेडचे श्री. गणेश अनंत सराफ ह्यांचा ह्या आख्यान–रत्न–मालेचा हा प्रयत्न हा तिसराच प्रयत्न होय. कीर्तनाचें वर सांगितल्याप्रमाणें महत्व असल्यामुळें श्री. सराफ ह्यांचाहि हा प्रयत्न तितकाच आदरास पात्र आहे, व हा तिसरा–चवथा प्रयत्न असल्यामुळें त्याचें महत्व पहिल्या प्रयत्नापेक्षां यत्किंचितहि कमी होत नाहीं. जुनीं व नवीं उत्कृष्ट आख्यानें एकत्र गोळाकरून तीं प्रसिद्ध करणें हें या मालेचें ध्येय उघडच, नांवावरूनहि दिसत आहे. आणि हीहि ह्या विषयांतील एक अत्यंत उपयुक्तच नव्हे, तर जरूरीची अशीच कार्याची दिशा आहे, हें कोणीही नाकबूल करणार नाहीं. '**कीर्तनतरंगिणी**, वगैरे धर्तीचीं एक दोन पुस्तकें पूर्वी मराठींत प्रसिद्ध झालेलीं आहेत; पण त्यांतील 'कीर्तनतरंगिणी' सारखीं त्यांतल्यात्यांत अधिक जुनीं असलेलीं पुस्तकें आज बाजारांत तर मिळत नाहींतच, पण कोणाच्याहि घरीं जरा कष्टानेंच सांपडतात असें मला वाटतें; व म्हणून ह्या दिशेनें प्रयत्न सारखा अधिकाधिक होत राहणें अतिशय जरूर आहे. शिवाय अशा एक दोन जुन्या पुस्तकांनीं हरिदासांच्या सुरस जुन्या आख्यानाचें भांडार छापून संपलें हें मुळींच शक्य नाहीं व खरें नाहीं; आणि ही बाकीचीं जागोजाग पडलेलीं किंवा केवळ परंपरेनें मुखोद्गत राहून अद्यापि कागद शाईच्या कैदेंत कधींच न सांपडलेलीं आख्यानें हि आपण कित्यांच्या

तोंडीं न पडूं देतां किंवा त्या त्या माणसांबरोबर न जाऊं देतां आपल्या मुलाबाळांच्यासाठीं म्हणून व आपल्याहि पुढल्या उपयोगासाठीं म्हणून कागद शाईच्या कडी कुलपांत घालून पुस्तकांच्या पेट्यांत कोंडून ठेविलींच पाहिजेत. नाहींतर वाङ्मयाचें फार **नुकसान** होणार आहे. तसेंच नवीन नवीनहि सरस आख्यानें बनूं नयेत किंवा बनत नाहींत असें नाहीं, व ही वाङ्मयाची नवी कमाईहि निष्काळजीपणें चोरापोरी न जातां वाङ्मयाच्या भांडारांत येऊन पडलीच पाहिजे, व त्यालाहि प्रस्तुत श्री. सराफ ह्यांच्या प्रयत्नासारखा प्रयत्नच सतत सुरू राहणें जरूर आहे, व त्याहि कामीं हा प्रयत्न उपयोगीं पडणार आहे हें ह्या पहिल्या भागाकडेहि नजर टाकतांच लक्षांत येणार आहे.

ह्या मालेच्या ह्या पहिल्या पुस्तकांत विठ्ठल शास्त्री चाकूरकर ऊर्फ "**चूडामणि-सुत**" कृत '**वत्सलाहरण,**' प्रसिद्ध **दासगणु** कृत '**अहल्याबाई होळकर,** व राजेजी महाराज कंधारकर ऊर्फ "**रुक्मांगद-सुत**" कृत "**श्री जयदेव चरित्र**" अशीं तीन आख्यानें आहेत. ह्यांपैकीं ह. भ. प. **दासगणूंचें** आख्यान हें नव्या कवीचें सरस, समयानुकूल, चटकदार अनेक चांगल्या व भारदस्त चालींनीं भरलेलें व काव्यगुण अंगीं असलेलें असें आख्यान होय. दुसरे दोन कवी हे नुसत्या बालबोध पद्धतीची रचना करणारे होत, असें त्यांच्या कृतीवरून दिसतें. त्यांतल्या त्यांत त्या दोहोंत "**वत्सला हरणा**" चा नंबर बहुधा रसिक वर लावतील.

आधींच उत्तम हरिदास होणें ही फार कठिण गोष्ट आहे. कारण चांगला हरिदास होण्यास भक्तीचा जिव्हाळा, स्वतःचा सदाचार, विद्वत्ता, काव्यांतील चतुरस्रता, चांगल्या वक्त्याचें वक्तृत्व, गोष्टी सांगण्याची हातोटी, विषयाची मांडणी करण्याची खुबी, जबर पाठांतरशक्ति, समयसूचकता, कोटिबाजपणा, वगैरे गुण लागून शिवाय चांगलें नसलेंच तरी निदान बऱ्यापैकीं तरी गायन, इतके दुर्मिळ गुण अंगीं असावे लागतात. इतके गुण एके जागीं सांपडणें किंवा कमावणें हेंच आधीं दुष्कर; पण हे सगळे गुण असले तरी **चांगल्या लिहिलेल्या आख्यानाची उणीव अखेर पुनःउरतेच!** कारण तें दुसऱ्याकडूनच पुनः हरिदासास लिहून मिळालें पाहिजे! नाहीं तर "उखळ्याला पुरवटा" ह्या म्हणीप्रमाणें ह्या सर्व दुर्मिळ गुणांचा समुच्चय त्या मनुष्याच्या अंगीं असून तो शिवाय स्वतः चांगल्या प्रतीचा कवीहि असला पाहिजे! म्हणजे स्वतःचीं आख्यानें लिहून घेईल. हें त्याहूनहि कठिण व दुर्मिळ! अशा स्थितींत हरिदासांस खरोखरीचींच चांगलीं, सरस, समयानुकूल **आख्यानें पुरविणें हें मोठें जरूरीचें व महत्वाचें काम आहे,** व तें इतक्या श्रमानें हातीं घेतल्याबद्दल श्री. सराफ व त्यांचे सहकारी ह्यांची करावी तितकी स्तुति थोडीच आहे.

श्री. सराफांची व माझी प्रत्यक्ष भेट कधींहि झालेली नाहीं. "विदर्भ-साहित्य-संघ" स्थापन करण्याचें वेळीं त्यांचा व माझा पत्रव्यवहार झाला. पण असें असून श्री. सराफ ह्यांनीं ह्या पुस्तकास प्रस्तावना लिहिण्याचें हें काम मजवर सोंपविलें ह्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे. ह्या मालेकडून आपल्या ध्येयाप्रमाणें उत्तरोत्तर सारखें अधिक उपयुक्त कार्य घडो, हरिदास त्याचा उत्कृष्ट फायदा घेवोत, इतर रसिक वाचक ह्या काव्यरसाचा आस्वाद घेऊन ह्या सत्कार्यास आश्रय देऊन मदत करोत, व परमात्मा त्यास यश देवो, अशी त्यास प्रार्थना करून, हा प्रस्तावना लेख पुरा करितों.

**उमरावती** (वऱ्हाड.)
श्रावण शुद्ध १२ शके १८४५

**बळवंत गणेश खापर्डे.**

दा. क्र. 2326
श्री. ...

# आख्यान-रत्न-माला.

## मंगलाचरण.

( संतकवि-दासगणू. )

पद [ता. त्रिवट]

हें नमन असो तव पाया धृ०
कोण करिल तुजविण दीनांची
पंढरिशा! वद माया १
सजल जलदसम नील तनू तव
योग्य कविस वानाया २
समर्थ अससी निज भक्तांला
इच्छित वर तो द्याया ३
दासगणूवरि कृपा करावी
ताप सकल ने विलया ४

# कविपरिचय.

**चूडामणिसुत**[1]–विठ्ठलशास्त्री चाकूरकर ऊर्फ चूडामणीसुत यांचा जन्म शके १७३२ त मोगलाईंतील बिदर जिल्ह्याच्या राजूर तालुक्यांत चाकूर नामक गांवीं चूडामणी यांचे पोटीं झाला. शास्त्रीबुवानीं आपल्याकवितेंत बहुतेक सर्वत्र 'चूडामणिसुत' याच नांवानें स्वतःचा उल्लेख केला आहे. क्वचितच 'विठ्ठल' असा उल्लेख आढळतो त्यांनीं कीर्तनाकरितां २५ च्यावर आख्यानें तयार केलीं असून ते स्वतःहि कीर्तनकार होते. त्यांचा एकंदर अदमासें २००० पर्यंत कवितासंग्रह आढळून येतो. शास्त्रीबुवा शके १७९२ च्या कार्तिक शु. ६ स नारायणस्वरूपीं लीन झाले.

**संतकवि दासगणु**–यांचें पूर्ण नांव गणेश दत्तात्रेय सहस्रबुद्धे. हे कोंकणस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मूळ गांव नगर जिल्ह्यांतील करकंब. यांचे विद्यागुरु[2] नांदेडचे रा. बाळाजी कृष्णाजी खेडकर वकील हे असून मोक्षगुरु इस्लामपूरचे श्री. वामनशास्त्री हे होते. यांनीं कांहीं दिवस पोलिस खात्यांत सरकारी नोकरी केली. हे पूर्वी रामजोशी, अनंत फंदीप्रमाणें लावण्यांचे कवि. महाराष्ट्रांतील भागवद्धर्माच्या रहस्याकडे मन वेधलें, तेव्हांपासून यांनीं नोकरीला रामराम ठोकला. नंतर त्यांच्या काव्य–प्रवाहाला, शिर्डीकर श्री साईनाथांच्या प्रेरणेनें निराळेंच वळण लागलें. संतचरित्रकार महिपतींचेंच कार्य यांनीं पुढें चालविलें आहे. याशिवाय संतचरित्रावर भक्तिरसप्रधान निरनिराळीं आख्यानेंहि रचिलीं आहेत. त्यांची कविता अत्यंत प्रतिभासंपन्न असून शिवाय ती प्रेमळ व प्रासादिकहि असते. हे मूळचे नगर प्रांतातले आहेत; परंतु त्यांना, संतोत्पादनाच्या कामीं विख्यात अशा श्री गोदावरीच्या कांठीं राहण्यांत अत्यंत प्रेम वाटतें. मी राहणार नगरचा। भोळ्या भाविक सीनातीरचा। आतां आश्रय मोंगलाईचा। करुनियां राहिलों ॥ १८६ ॥ नगरप्रांत तरी गोदातीर। **नांदेड** तरी गोदातीर। म्हणून माझें देशांतर नाहीं मुळींच जाहलें ॥ १८७ ॥ या त्यांच्या गोदामाहात्म्यांतील उद्गारांवरून गोदावरीचें नाभिस्थान असणाऱ्या आमच्या नांदेडचा त्यांना किती अभिमान आहे, हें स्पष्ट होतें. **दासगणु**सारखा प्रेमळ कीर्तनकार–हरिदास सबंध महाराष्ट्रांत क्वचितच आढळेल !

**रुक्मांगद–सुत**–सदाशिव ऊर्फ राजेजी महाराज कंधारकर हे देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण. मूळपुरुष रामाजीपंत असून ते गोदावरीच्या उत्तरेस असलेल्या कानडखेडचे. रामाजीपंताचे पुत्र हणमंत. हेच सुप्रसिद्ध कंधार (मोंगलाई) येथील साधूमहाराज. जयसिंव्ह नामक रजपूत राजानें साधूमहाराजांचें राजकारणपटुत्व जाणून त्यांना कंधार येथें आणवून ठेवून घेतलें. हे दत्तसाक्षात्कारी असून यांचें संस्थान अद्याप कंधार मुक्कामीं आहे. **साधु म.** चे पुत्र **भास्कर** ऊर्फ **भाऊ म.** त्यांचे रुक्मांगद व ह्याच रुक्मांगदाचे सदाशिव ऊर्फ राजेजी म. हे मधले चिरंजीव. हे गृहस्थाश्रमी असून ह्यांचाहि शिष्य संप्रदाय पुष्कळ आहे. ह्यांनीं शिष्यमंडळी नाटकी चाली म्हणूं लागली असतां त्याच चालीवर तेव्हांच देवाचीं पदें रचून देऊन त्यांना भक्तिमार्गास लाविलें. त्यांनीं कीर्तनोपयोगी ९–१० आख्यानें रचिलीं असून शिवाय स्फुट पदेंहि केलीं आहेत. ह्यांचें देहावसान ६ वर्षांपूर्वींच गंगाखेड मुक्कामीं झालें. ह्यांचे दोन चिरंजीव विद्यमान असून त्यापैकीं धाकटे तर कीर्तनकार आहेत.

---

१ महाराष्ट्र कविचरित्र भाग ५ वा पहा. २ दासगणुकृत भक्तलीलामृत. अ. ५३ ओ. १०१ पहा.

# वत्सलाहरण.

कविवर्य

## विठ्ठलशास्त्री चाकूरकर

उर्फ

## चूडामणिसुत

विरचित

### १ पद [ ये रे गरुडावरि ]

कृष्णजी निज नत जन तारी सखा दासाचा कैवारी धृ०
वत्सला नामें बल[1]-कन्या रेवती[2] प्रसवे नृपमान्या
त्रिलोकीं नारींत जी धन्या तुलेना रमणी जिस अन्या
नेमिली अभिमन्युस जन्या[3] पावले पांडव गति वन्या[4]
विपत्तिस कैंचा साहाकारी सखा दासाचा० १

वत्सला अभिमन्यूला द्यावयाची हें पूर्वी पासून ठरलेलें परंतु,

चालल्या माहिषीच्या शृंगा झोंबला[5] रामहि धन—संगा
न मानी भागिनी, श्रीरंगा नेम[6] तो पावविला भंगा
सुयोधन- तनया[7] दुःसंगा ओपिली तनया[3] अव्यंगा[8]
ठरविला निश्चय परभारी[9] सखा० २

इकडे सुभद्रेच्या मनांत असें वाटे कीं,

### २-३-४ आर्या

बलदेवानें स्वहिता दुहिता[3] अर्पावि भागिनेयाला[10]
तीतें निर्बल भलता होइल कैसा विभागि नेयाला[11] ?
पांडव विनष्ट झाले, आलें सर्वस्वि भाग्य कुरुपाला[12]
लक्ष्मण संमत भासे मलयजगर्भाहुनीहि उरु[13] पाला
हा कामपाल भुलला तें धन इतरांस काय मोहीना ?
या खेदेंच सुभद्रा बोले, ' दैवा ! तुला नमो ! हीना !

---

१ बलराम. २ बलरामाची स्त्री. ३ मुलगी. ४ वनाची. ५ लक्ष्मीला. ६ अभिमन्यूला द्यावयाची हा नेम. ७ लक्ष्मणाला. ८ सर्वांगसुंदर. ९ सुभद्रेला न कळवितां. १० भाचाला. ११ ने (न्यायाला.) १२ दुर्योधनाला. १३ श्रेष्ठ.

बलरामानें वत्सला लक्ष्मणास देण्याचा विचार केला त्यावेळीं,

५ पद [ ये रे गरु. ]

सुभद्रा कुंती सहचाला कंठिती विदुराश्रमिं काला
राजसदनाहुनि चर[1] आला 'चलाहो बाई लग्नाला'
ऐकतां खेद सुभद्रेला त्यागिलें भोजन, निद्रेला
पुढे अभिमन्यू द्रुतचारी[2] सखा०

अभिमन्यु (सुभद्रेस):– ६ पद [ता. दीपचंदी]

माते ! कोणत्या शोकाची शंका मुखचंद्रें कां धरिलें कलंका धृ०
श्रीकृष्ण बंधु हलधर साथी करगत मानावी लंका १
वनवास सेवूनि येतील पूर्वज क्षाळावें कल्पना—पंका २
क्षत्ता[3]हि कुरवाळी घडिघडि आपणा सेवावें काय अतंका[4] ३
चूडामणिसुत अनुकूल माधव निजपद ओपितो रंका ४

आपलें शांतवन करीत असलेल्या पुत्राचें भाषण ऐकून सुभद्रा त्याला:–

७ पद [ लावणी ]

राजसा! ऐक पाडसा! मनाचा शोक
हे आस कुणाचे जनिं चलतीचा झोंक धृ०
धनवंत तोचि गुणवंत, तोचि रणशूर
निर्धनी नराला सकलहि करिती दूर
जरि भलतें बोले धनी नगरचा धूर[5]
अति नीति कथुनि दुबळ्याची होते क्रूर[6]
गंभीर धनी आळशास नांवचि पडतें
बोलणें सुचेना त्या मित भाषण घडतें
कीं सखा, मित्र, सुत, बंधु, धनाचे लोक हे० १
बलरामाची कन्यका 'वत्सला' गोड

१ दूत. २ दुडुंच जाऊन. ३ विदुर. ४ चिंता. ५ नायक. ६ चेष्टा.

तुज वधू नेमिली आधिंच बोलुनि होड[1]
पांडव मुकले निज पदा घेतली मोड
सोयरा सुयोधन भूप जोडिली जोड
वर लक्ष्मण जातो उद्यां द्वारकानगरा
मम दुःखभरानें मानस झालें भंगरा[2]
कांहिं प्रयत्न पाहूं जरि तूं एकट तोक[3] हे० २

हें तिचें भाषण ऐकून,

अभिमन्यु म्हणे माउली! कशाचा घोर
दो पैशानें का यादव झाले थोर?
क्षणमात्रें आणिन वधू न होतां चोर
परि सारथि नाहीं यास्तव खचला जोर
वीरसू[4] सुभद्रा सहसा सारथि बनली
वायुचा वेग जिंकुनी स्वस्यंदन[5] हांकली
चूडामणिसुत रक्षिता अंतरीं धोक हे० ३

सुभद्रा सारथी होतांच अभिमन्यु तिला म्हणाला;

## ८ आर्या.

सौभद्र म्हणे भद्रे! आणिन जिंकून वत्सलाहीना!
ती कौरवां अलभ्या! वंध्या सुरभीस[6] वत्स लाहीना[7]

लग्नसमारंभा करितां कौरवांकडील वरपक्ष थाटानें निघाला, तेव्हां,

## ९ पद [ ये रे गरुडा० ]

भूप दुर्योधन सुरवाडी[8] वीरवर संगें बहु धाडी धृ०
सादि[9],रथ,कुंजर, धूंपगाडी[10] पथानें किति चालति धाडी[11]
उतरले सुरवर न वऱ्हाडी द्वारका गांठिति जल-खाडी
राहिले शिबिरीं[12] गजभारी सखा० १

---

१ करार. २ चुरा. ३ मुलगा. ४ वीरपुत्राला प्रसवणारी. ५ रथ. ६ धेनुला. ७ मिळेना. ८ सुखी. ९ घोडेस्वार. १० बैलगाडी. ११ टोळ्या. १२ तळ देऊन त्यांत.

याप्रमाणें हे द्वारकेला जाऊन पोंचतात न पोंचतात तोंच, इकडे

अन्यमार्गें नंदन, माता स्यंदनीं स्मरती स्मर-ताता[1]
हिडिंबा-वन मिनलें जातां पुरेना परि पादप[2] गातां[3]
रथाची गति पावे घाता वीर तो उघडी निज भाता[4]
सोडी शर एकाचि अनिवारी सखा० २
तोडिली वृक्षांची धारा चालला स्यंदन परपारा
घटोत्कच घे राक्षस-भारा[5] येउनी करि अद्भुत मारा
सोडी अभिमन्यु शर सारा[6] नावरे, कोण पर्ण[7] चारा
ताडिला प्रस्तर[8], असु[9] मारी सखा० ३

घटोत्कचानें मारिलेल्या शिळेनें अभिमन्यु निश्चेष्ट होऊन पडला; हें पाहून सुभद्रा आक्रोश करून देवाचा धांवा करूं लागली.

१० पद [ ताल–दीपचंदी. ]

सांवळे कृष्णाई कनवाळे! धांव घननीळे! घेई ओसंगा[10]माजी ध्रु०
पाडस सांपडे पाशाला पावे नाशाला हरिणी हुरहूर पाहे
वत्सातें शार्दूल आकली उभी ठाकली धेनु निरुपाय राहे
अंधाची हरपली ही काठी आतां महीपाठीं माझी ती गति आहे
एकुलतें एक हें बाळ नेतो या काळ बाई तूं होय साह्य
सर्वत्र व्यापक राहसी कर्मे पाहसी कोठें तटलीस[11] आजी १
दाक्षिणा मृतसुत अर्पिला गुरु[12] तर्पिला[13] तुझी त्रिभुवनिं ख्याति
जतु[14]-गेहिं राखिले पांडवा करिती तांडवा[15] यश अद्यापि गाती
सुत-दान करि मज आहेरा आल्यें माहेरा नाहीं तुजविण साथी
उत्पत्ति– पालन—नाशाला मोक्ष पाशाला[16] हेतु[17] तूंच विजाति[18]
बहुरुपें निजदासां तारिलें दुष्ट मारिलें आळस कां माझें काजीं २
दासाची दासी मी समजावी रूप मज दावीं नको उशीर आतां

---

१ कृष्णास. २ वृक्ष. ३ वर्णनकरितां. ४ बाणठेवण्याची पिशवी ५ समुदाय ६ तीक्ष्ण. ७ पान हेंच ज्याचे खाद्य असा. ८ शिला. ९ प्राण. १० पदरांत ११ अडून बसलीस. १२ गुरु सांदीपनी १३ तुष्ट केला. १४ लाक्षागृहीं १५ अभिनयपूर्वक नृत्य. १६ बंधनाला १७ कारण. १८ त्याहून निराळा.

अनुकंपा द्रवली ती भाउली[1]   वेगें   धांवली   दिसे धवधव   माता
अमृत—कूपिका   ओपिली   भीति   दापिली[2]   दिलें   निर्भय   हाता
सौध[3]-विंदु   मुखीं   पाजिला   वरि   साजिला   गर्जे   राक्षस - घाता
चूडामणिसुत-—नाथाचा[4]   युद्ध करि भाचा[5]   सोडि बाणांची राजी[6]   ३

घटोत्कचाबरोबर अभिमन्यू पुनः युद्ध करूं लागला.

## ११ पद [ ये रे गरु० ]

यातुधाना[7] लक्षुनि लक्षीं[8]   पार्थजें शर हाणिला वक्षीं[9]
महा चपला[10] कडके वृक्षीं   ससाणा[11] का झडपी पक्षी
अचेतन पडला पलभक्षी[12]   हिडिंबा धांवे रुदिताक्षी[13]
'अरे तनया!' ही हांक मारी   सखा०   १
सुतानानिं[14] ठेवुनियां वदना   राक्षसी करि अद्भुत रुदना
मला सोडुनि वत्सा! अदना[15]   जासि का वैवस्वत[16]- सदना
पंडुसुत असते या कदना[17]   पाडिते काळाच्या रदना[18]
पार्थ ना भीमहि साहाकारी   सखा०   २

पांडवांचीं नांवें एकाएकीं कानीं पडतांच सुभद्रा चकित होऊन हिडिंबेला विचारिते;

## १२ पद [ ता. दीपचंदी. ]

कोणाची बाई वद कोण रामा[19]   आठविलें कोणासि त्वां गुणधामा   धृ०
कोठिल पांडव, कोण वृकोदर[20], कोणता अर्जुन त्यास सहोदर[21], राहति कोठें सांग अगोदर

सुभद्रेचा प्रश्न ऐकून हिडिंबा म्हणते;

भीम पती मम कुंतिजे[22] दुसरा, पंडु महीपती तो माझा सासरा, अर्जुन, देवर[23] त्याचाचि आसरा   २

हिडिंबा आणि आपण अगदीं जवळचे संबंधी आहों, हें पाहून सुभद्राहि ओळख देते:—

अर्जुनपत्नि मी तूं माझी जाऊ, उठविलें पुतण्यासी किति समजाऊं चूडामणिसुत लग्नासी जाऊं.   ३

अभिमन्यूला देऊन उरलेलें अमृत तिनें तात्काळ काढिलें.

---

१ श्रीकृष्णाई २ दापली. ३ अमृत बिंदु. ४ श्रीकृष्णाचा. ५ अभिमन्यु. ६ पंक्ति. ७ राक्षसाला—घटोत्कचाला ८ नेमधरून. ९ छातींत. १० वीज. ११ पक्षीविशेष (श्येन.) १२ मांसाहारी. १३ रुदत. १४ मुलाच्या मुखीं. १५ खाण्यास. १६ यमाच्याघरीं. १७ युद्धाला. १८ दांताला. १९ स्त्री २० भीम. २१ बंधु २२ कुंतीच्या पोटचा. २३ दीर.

१३ पद [ ये रे गरुडा ]

सुभद्रा मुखीं अमृत [1]ओपी उठे तो जणुं सांडुनि झोंपी
आवेशें शर योजी कोपी हिडिंबा स्वसुता आटोपी
तुझा हा बंधु सं[2]गोपीं साध जा, तुज कन्या सोपी
आतां [3]इतरेतर साहाकारी सखा० १

हिडिंबेनें असें म्हणतांक्षणींच त्या उभयतांचा स्नेहभाव दृढ झाला. तेव्हां,

घटोत्कच बहु राक्षसजाति मातुला घेउनि सांगाती
[4]प्रभासीं [5]वरयुक्त रहाती द्वारका गुप्तार्थी पाहाती
भागिनेय, मातुल सांगाती वृत्ता कृष्णासी गाती
हरि ही मत दे परभारी सखा० २

कृष्णाची संमति होतांच मग उशीर कसला ? लागलींच,

हिडिंबासुत, जागिळ मामा अप्सरा सम बनल्या [6]रामा
[7]वंचुनी नांगर—बलरामा पावल्या रेवतिच्या [8]धामा
मानिल्या वरपक्षी [6]वामा अर्पिलें आसन [9]सत्कामा
बोलती वार्ता [10]अरुवारी सखा० ३

१४ पद [ ता. त्रिवट. ]

सई आम्ही [11]महीपतीच्या दासी धृ०
बहु गुण अपुले कथिती बाई ! लक्षच तुमचें पाशीं १
बहुत वधूला नग घडवाया पडल्या कांचनराशी २
नवरी पहावी वेतणी व्यावी आवड ही सकलांसी ३
चूडामणिसुत नकलुनी कन्या रेवति ओपी त्यांसी ४

१५ पद [ ये रे गरुडा. ]

अहो अद्भुत राक्षसमाया वत्सला ठेविति तरुछायां
घटोत्कच घेतां वधु- काया पाववी मातुल निज ठायां

---

१ घाली. २ काळजानें पालन कर. ३ परस्पर. ४ क्षेत्रविशेष. ५ वर–अभिमन्युसह. ६ स्त्रिया. ७ ठकवून ८ घराला ९ शुभकार्याकरितां १० हळूंच ११ दुर्योधनाच्या.

'बाई तुमची कन्या घ्या! या!' रेवती लागे गुण गाया
आला परतुनि मायाचारी[1] सखा० १

खरी वत्सला जाऊन रेवतीजवळ खोटीच वत्सला आली.

### १६, १७ आर्या. (गीति.)

ती कन्या मायावी 'माते! दे भोजना क्षुधा नाशी'
अर्पी तीतें रेवति लड्डुकखंडास[2] दिक्षुधानासी[3]
ती समजेना जाणुनि नेली सहसा[4] महानसीं[5] विमला[6]
वदली 'एकट जेविन वल्लव[7]! तूंहि न पहा, न सीवि[8] मला'

याप्रमाणें स्वयंपाकघरांत एकटें राहून, वत्सलेचा वेष धारण केलेल्या घटोत्कचानें लग्नाकरितां केलेल्या सर्व खाण्याच्या वस्तूंचा फडशा उडविला. थोड्या वेळानें मंडळी येऊन पाहते तों काय आश्चर्य !

### १८ पद [ चा. माते कोणत्या. ]

काय धाडी पडली पाकीं कांहीं नाहींच उरली बाकी धृ०
हलधर[9] आतां गांजिल कोपें वल्लव भाजन[10] झांकी १
दैवगती या स्थाळींची समजा निवडेल हें परिपाकीं[12] २
चूडामणिसुत रंधन[11] दुसरें करवुनि पात्रें टाकी ३

घटोत्कचाचा फराळ उरकतांक्षणींच इकडे,

### १९ पद [ चाल. ये रे गरुडा. ]

राक्षसा मातुल आज्ञापी लुटावे कौरव परतापी[13]
उडाले झेंपावति[14] झांपी[15] आमिषा[16] जैसे आतापी[17]
हाट[18] वनविति ते मनमापी वेदिका[19], पट[20], सदनें[21], वापी[22]
वस्त्र, नग, शर, धनु, तरवारी सखा० १

असा अपूर्व बाजार एकाएकीं भरलेला पाहून,

---

१ राक्षस–मामा. २ लाडू. ३ साखरपोहे. ४ तात्काळ. ५ स्वयंपाकघरांत. ६ शुद्ध ७ स्वैपाक्या. ८ स्पर्श करूं नकोस. ९ बलराम. १० पात्र. ११ स्वयंपाक १२ परिणामीं. १३ दुसऱ्यांना ताप देणारे. १४ उडी टाकतात १५ झांपड. १६ मांसाला १७ घार. १८ बाजार. १९ ओटे २० कपडे २१ घरं. २२ विहिरी.

धांवती कौरव मनभोळे घेति नग झांकुनियां डोळे
वेंचिती निज कांचन गोळे नेणती किति मासे तोळे
घेति शर, कार्मुक, कंचोळे मौक्तिकें, वसन, खडे पौळे
नाडिले बालक, नर, नारी सखा० २

कौरवांनीं जुन्या वस्तू देऊन त्यांच्या मोबदल्यांत सर्व नव्या वस्तू घेतल्या, परंतु त्यांचा उपभोग घेऊं लागतांच त्या सर्व आकाशांत उडून जाऊं लागल्या.

२० पद [ ता. दीपचंदी ]

हें कौतुक काय विचारा दुर्योधन गुरके चांग धृ०
पट, कुंटिका कां चालति गगनीं पहा चोरांचा थारा १
एक वदे, 'मम मुकुटचि नाहीं झटकुनि नेलें हारा' २
किंवा यादव करिति विनोदा काय अनुत्तम धारा ३
चूडामणिसुत समया [illegible] उजेडाचि पडला सारा ४

याप्रमाणें कौरवांत धांदल उडाली आतां तीच संधि साधून इकडे,

२१ पद [ ये रे गरुडा· ]

मातुलें आणिलें मुनिवर्या परस्पर पावति आश्चर्या
भयानें ते साधिति कार्या वत्सला, अभिमन्युस भार्या
हरुनी कुरुपति- ऐश्वर्या सांगती 'फिरली दिनचर्या
प्रभासीं उत्सव- भरभारी' सखा० १

२२ पद [ ता. धुमाळी ]

लग्नाची घटका आली जा कौरव जन हटका धृ०
कुरुपति दळभारी निघाला सिरवत परिवारीं
रथ, शिविका चारीं घाई पुढें वाद्यांची भारी
पतिव्रता नारी ठाकती कलशासह द्वारीं
वसवी सह कटका आली० १

---

१ सोनें. २ धनुष्य ३ लहानसें पूजापात्र. ४ बुडविले. ५ रागें भरी ६ दूताला. ७ घरें. ८ उत्तम. ९ रीत. १० थांबवा. ११ सैन्य.

मंडपिं जन दाटी नाचती [1]वारवधू — थाटी
नि[2]गमाच्या घाटी गर्जती ब्राह्मण [3]बोभाटी
पौ[4]रवधू [5]वाटीं वर्गिले नृपपूर्वज भाटीं
बंदी जनां सुटका आली० २

आनंदाचा दिवस म्हणून दुर्योधनानें कैदेंतील लोकांची सुटका केली. असा सर्व थाटचथाट चालला आहे तितक्यांत,

वधु आणिली लोकीं घटोत्कच समया अवलोकीं
मायावी [6]तोकी वरातें निजचरणें रोखी
[8]गुळ, जीरक [9]झोंकी बुडाला लक्ष्मण भय-शोकीं
लग्नोत्सव लटका आली० ३
कुरु पाहाति काया नव्हे नवरी राक्षस-माया
धांवति आवराया वाटलें परमाद्भुत राया
पुरुष, पौरबाया रेवती मो[10]कलिती धाया
विठ्ठल—मानिं चुटका आली० ४

## २३ आर्या.

उच्च घटोत्कच गर्जे टिकता तुम्हि काय यातुधानाक्षी
हा दुर्योधन कपटी समजुनि वीरांसि का [11]मुधा [12]नासी

त्यावेळीं घटोत्कच घडलेलें सर्व वर्तमान सांगू लागला.

## २४ पद [ चा. काय धाडा पडली. ]

आतां कौरव माघारे परता का वायांचि कोपोनि मरता धृ०
हलधर-कन्येसी [13]विधिनेंचि घडला अभिमन्यु समरूप भर्ता १
वधुवर दोघे असती प्रभासीं त्यागा संशय — [14]गैंर्ता २
हाटाचीं [15]सौंनगें राक्षस बनले मीच घटोत्कच कर्ता ३
चूडामणिसुत [16]गजपुरा जारे! श्रीहरि — चिंतानिं [17]वैर्ता ४

---

१ वेश्यांच्या २ वेदाच्या. ३ मोठ्यानें. ४ नागरीक स्त्रिया. ५ वाटिका—बागेंत. ६ मुलगी. ७ पायानें दाबूं लागली. ८ गूळ आणि जिरें. ९ घटाघट पिऊं लागला. १० रडूं लागल्या. ११ व्यर्थ. १२ नाशी. १३ ब्रम्हदेवानें. १४ गार. १५ दागिने. १६ हस्तिनापुर. १७ वागा.

घटोत्कचाचें हें भाषण ऐकून दुर्योधनादि कौरव साश्चर्य पाहूं लागले तोंच,

**२५ पद** [ चा. ये रे गरुडा. ]

प्रगटल्या रात्रिंचर[1]—कोटी　　लघुगुरु[2] वस्तूंचे पोटीं
घुंघट[3], लुगडीं, कंचुकी खोटी　　स्त्रियानर- तनु दिसती थोटी
ओढिती शर मात्रा बोटीं[4]　　राक्षसा- कृति[5] भासे मोठी
पळाले कौरव लाचारी[6]　　सखा०

इकडे अत्यंत थाटमाटानें वत्सलेचा अभिमन्यूशीं विवाह झाला. यादवांच्या वर्तीनें श्रीकृष्ण सुभद्रेला म्हणाला.

**२६ पद** [ चा. माझी विनवणी. ]

धन्य धन्य तूं वीरपत्नी　　पुत्रही तुझा पुरुषयत्नी　　ध्रु०
आम्हां यादवां तुवां हरिलें　　महत्कार्य हें मनीं धरिलें
वस्तु[7] आपलि आपण वरिलें　　इथुन गांधार[8]—पुण्य सरलें
चल द्वारके　　सह वधुवर परिवार के[9]
मानिलें मुशलधारकें[10]　　आणिलें पुजुनि रत्नीं　　१

हें देवाचें भाषण ऐकून कृतज्ञतापूर्वक अंतःकरणानें,

सुभद्रा म्हणे बंधुराया　　'तूंच जाणसी तुझी माया
अहंकर्तृता मनीं वाया　　स्मरावें मुख्य तुझ्या पाया
याच साधना　　कोणतें विघ्न बाधना[11]
त्या वांचुनि फल साधना[12]　　नेमिलें विबुध[13] प्रत्नीं'　　२

यावरून प्रभूचें भक्तवात्सल्य अंतःकरणांत ठसल्यामुळें, कविः—

महासंकटीं उडी घाली　　स्वकीयां दासां प्रतिपाळी
पूर्णकाम हा सर्वकाळीं　　कल्पपादपसम[14] वनमाळी
धाउनी वना　　करितसे पांडवावना[15]
चूडामणिसुत- भावना　　श्रीगुरु — चरणवत्नीं　　३

**संपूर्ण.**

---

१ राक्षस. २ लहानमोठ्या. ३ घुंगट. ४ बोटें ताणून बाण मारूं लागले. ५ राक्षसाचीक्रिया. ६ निरुपाय होऊन. ७ वस्तु शब्द संस्कृताप्रमाणें नपुं० वापरला आहे. ८ कौरव ९ चल के—चल कशी. १० बळरामानें. ११ बाधत नाहीं. १२ साधत नाहीं. १३ पूर्वींच्या शहाण्या लोकांनीं १४ कल्पतरुप्रमाणें. १५ पांडवांचें अवन—रक्षण.

# श्री अहल्याबाई होळकर.

## संतकवि दासगणु

### विरचित.

१ आर्या.

देवी सती अहल्या भारतभूला ललामभूता[1] जी
चतुराहि राजकारणिं असुनि जिनें ठेविला हरी राजी

२ दिंडी.

मेषपालाच्या[2] वंशिं दक्षिणेंत उदित[3] झालें स्त्रीरत्न मूर्तिमंत
किती वानूं मी तया अहल्येला सिनों[4] कांठीं चोंढींत जन्म झाला

३ ओवी.

पाथर्डीचा रहिवासी आनंदराव शिंदा परियेसी
अहल्याबाई त्याचे कुशीं जन्म घेत्या जाहल्या

पद ४ (चा. हाकाय तु० )

व्यवसाय जयाचा अतिशय खडतर किती कथूं वाचे
कांहीं शेती कळप संग्रहा शेळ्यां मेंढ्यांचे
ऊन, वारा, साहि खरा, विश्रांति घे न जरा
करुनि कष्ट अति कसें बसें करि पोषण उदराचें

अहल्याबाई जन्मली तो प्रांत तरी सुपीक होता म्हणावें तर तसेंहि नाहीं,

५ लावणी.

दुष्काळी मुलुख तो आधीं, दया कधिं येइल देवाला बाभळी हिवर जंगला
कुठे कचित धनत्तर[5] विहिरी मळ्याभीतरीं दुकळ पाण्याचा सरितेस[6] पूर वालुचा
टेकड्या, माळ आणि कडे भुषित तरवडे, फण्या निवडुंगा सर्वत्र मुभा[7] ती बघा
पीक पिके ज्वारि, बाजरी तीहि ना पुरी, अहा हत दैवा! **गणु म्हणे पाव माधवा!**

---

१ भूषणभूत. २ धनगराच्या. ३ उदयाला आलें. ४ नदीविशेष. ५ प्रचंड. ६ नदीस. ७ मोकळीक.

### ६ आर्या.

परि दुबळ्याची आली कींव पहा वृद्धतीर्थजननीला
घेउन अंकीं खेळवि गोदावरि माय 'नगर' जिल्ह्याला

### ७ श्लोक [मंदाक्रांता]

वा तो जिल्हा प्रति गमतसे मूर्ति त्या शंकराची
एकालाही जगतिं नच ये योग्यता हो तयाची
दुर्भिक्षाची धवल विभुती, वीष दुष्काळ कंठा
शिर्पी गंगा, शिवद सकलां; नाहिं नाहीं करंटा

एकदां आनंदराव कांहीं कामाकरितां आपल्या शेतात गेला असतां, वेळ झाल्यामुळें त्याची पत्नी सारखी वाट पहात बसली. तितक्यांत, एक गोसावी दारांत येऊन भिक्षा मागूं लागला.

### ८ पद [चा. गुरुदत्तदिगं०]

श्रीसांब सदाशिव भजले नरतनुका सार्थक करले धृ०
नरमुंडनकी माला कंठीं सिरपर गोदा माता
थय थय थय थय नृत्य करत हर भुवनत्रयके पाता श्री० १
गजचर्मांवर ओढ लियाहै, डिम डिम डमरु बजावे
भुं भुं भुं भुं शंख बजतहै, सन्मुख नारद गावे श्री० २
वीरभद्र गणनाथ षडानन बैठे हरके साथ
कहे **दासगणु** चलो भाइयो! उनसे जोडो हात श्री० ३

दारांत साधु आलेला पाहून, अत्यंत धर्मभावनेनें तिनें त्याला भिक्षा घातली. तोहि इतर वैरागी, गोसाव्यांप्रमाणें नव्हता. भिक्षेनें संतुष्ट होऊन त्यानें बाईच्या मनांतली चिंता–पोटीं अपत्य केव्हां होईल ही तळमळ–ओळखली. तात्काल त्यानें आशिर्वादपूर्वक उपाय सुचविला कीं,

### ९ श्लोक [पृथ्वी]

जगज्जननि अंबिका कमलजा रमा इंदिरा
उभी अशिव–नाशना कलियुगांत कोल्हापुरा
तदीय पद आठवीं; करिल पूर्ण ती कामना
नको बसुंस या स्थळीं त्वरित जा! तिच्या दर्शना

---

१ गोदावरीला. २ मांडीवर. ३ पांढरें भस्म. ४ मस्तकीं. ५ कल्याण करणारी. ६ पालन करणारे. ७ अशुभ.

असें बोलून, तो गोसावी निघून गेल्यावर आनंरावहि शेतांतून परत आला. भोजन झाल्यावर तिनें पतीला सर्व वर्तमान सांगितलें व शेवटीं म्हटलें कीं-

१० ओव्या [जात्यावरील]

नाहिं आपणाला संतति धिक् संसार प्राणेश्वरा!
आळवूं ती आंबाबाई चला करवीर कोल्हापुरा

नंतर उभयतां दांपत्य त्या गोसाव्याच्या सांगण्याप्रमाणें जगदंबेचें दर्शन घेऊन आलें. पुढें थोड्याच दिवसांत त्यांचे मनोरथ पूर्ण होऊन योग्यकालीं,

११ आर्या [गीति]

अष्टभुजा नारायणि विकली बुधहो! खरीच भक्तीला
जन्मा येई निजांशें शिंद्या—पोटीं[1] हरि-प्रिया कमला

१२ दिंडी.

अहल्या हें कन्येस ठेवियेलें नाम, जननीजनकांस सौख्य झालें
दिवस, मासें ती पुढें थोर झाली जणूं वाढूं लागली भाग्य[2]—वल्ली

बालपणीं अहल्या लहान मुलींत खेळावयास जाई. त्यांचे खेळ हिला न आवडून उलट हीच त्यांना आपला आवडीचा खेळ सांगतांना बोबड्या शब्दांनीं म्हणे.

१३ ओव्या[जात्यावरील.]

नका खेळूं ग पोलिनों! ओंगलशा भातुकलिला
चला पहाया मम अंगणीं म्यां मल्हाली मांदिला
जो लाजा जेजूलिचा दीनदुबळ्यांचा ग धनी
उभ्या सेवेस दोब्राजुला बानु, म्हालसा कामिनी
वाहुं भंदाल खंदोबाला तली[3], आलती कलूनियां
या ग!'हलहल महादेव' म्हणा सई चिंतामन मोलया

त्या पाथर्डींत एक ब्राम्हण पंतोजी होता. तो मुलांमुलींना लिहावयाला, वाचवयाला शिकवीत असे, त्या,

१४ ओवी.

पंतोजींचें प्रेम भारी जडलें तया अहल्येवरी
कोणा साखर रायपुरी नावडे सांगा विबुधहो!

---

१ इ. स. १७२५ २ ऐश्वर्याचो वेल. ३ तळी.

१५ पद [ चा. मित्राममज० ]

घेउनियां अंकिं शिकवि तिज लिहावया
रंजनार्थ गोष्टी कथि बघुनि तद्वया धृ०
प्रऱ्हादें बालपणीं जोडिला हरी
तूंही का करिशिल गे! सांग त्यापरी
हरि–भक्तीविण सौख्यद वस्तु ना खरी
सत्य वदे, ठेवीं दया, त्यजि न कधिं नेया[1] १

हरिभक्तीचा याप्रमाणें धडा दिल्यावर पंतोजानें प्राचीनकालांतील राजस्त्रियांचे उत्तमोत्तम उदाहरणां–सह चरित्र–पाठ दिले ते असेः—

१६ लावणी.

ती राणी हरिश्चंद्राची काशि सत्वाला जागली
दमयंती नलाची कांता महा पतिव्रता माउली
चाल– द्रौपदी बहिण देवाची, बहुत आवडीची तिच्या अब्रुची
बूज राखीली वस्त्रें अगणित पुरविलीं

नंतर त्यानें सांगितलें कीं, केवळ प्राचीन काळींच नव्हे तर अर्वाचीनकालींसुद्धां अत्यंत नीतिमान् व परमेश्वराच्या लाडक्या अशा स्त्रिया झाल्या आहेत.

१७ लावणी.

जनी दासी नामदेवाची तिची कथा सांगतों तुला
जिनें भक्तिबळानें बाई! विठु जात्यावर बसविला
तूं तसें अहल्ये! करीं, उरविं भूवरी, कीर्ति निज खरी
नको पडुं ख्यालीं[3] नच अर्थ भवामधें[4] मुळीं

१८ आर्या [ गीति. ]

हृत्पाटें खोदुन ठेवी सुबोधशीं अमृततुल्य गुरु–वचनें
मानसजल[5] प्यायाला असल्या हंसास सहज तें माने[2]

असें असतां एके दिवशीं श्रीमंत रघुनाथरावदादासाहेब पेशवे हे मल्हारराव सुभेदारासह उत्तरहिंदुस्थानांतून आले. ते पाथर्डीत आपल्या छावणींत उतरले. सुभेदारांबरोबर त्यांचा मुलगा खंडेरावहि होता.

---

१ न्याय. २ मान्यता. ३ चैनींत. ४ संसारांत. ५ सरोवरविशेष.

श्रीमंत पेशव्यांची स्वारी आल्यामुळें पंतोजी शाळेला सुटी देऊन, मुलांमुलींना घेऊन तेथील मारुतीच्यां मंदिराच्या सभामंडपांत आले. तेथें सहज श्रीमंताची स्वारी मंडळीसह बसली होती त्यावेळीं अहल्येला पंतोजी:—

### १९ झंपा.

मुली शाहु सम्राट[1] नृप छत्रपति ते सकल हिंदूप्रती अन्नदाते
पूर्वकालीं जसा धर्मराजा तसा नृपति हा; सांगतों सत्य तूंतें
हे तदीय प्रधान, पेशवे गुणानिधान आदरें यां करी वंदनातें १

पंतोजीनें सांगितलेली माहिती ऐकून अहल्या श्रीमंतांना म्हणाली—

### २० ओव्या.

हिंदुपद पादशाहीचे तुम्हि प्रधान असला जरी
सांगा भूपतिच्या नांवाला तुम्हिं जागविलें कुठवरी ?
अहो! प्रधान सेनापती नृपतीचे दोन्ही कर
म्हणुनि पुसत्यें माफी करा मी धनगराची पोर

### २१ आर्या.

ऐकुनि बोल तिचे ते राघोबा खदखदा मनीं हांसे
'ऐसें ज्ञान मुलीला आलें इतक्या वयामधें कैसें'

### २२ ओवी.

वत्सराजाचा प्रधान होता योगंधरायण
त्यानें अपार मुलुख जिंकून नांव धन्याचें वाढविलें १

हें अहल्येनें दिलेलें ऐतिहासिक उदाहरण ऐकून मंडळी चकित झाली.

### २३ दिंडी.

तदा दादा बोलले सुभेदारा तुझ्या खंडूला योग्य हीच दारा
तोहि खंदा[2] तशि हीहि कमी नाहीं अशा रत्ना पदरांत झणीं घेईं

### २४ ओवी.

तें मानलें सुभेदारा साखर पुडा झाला खरा
लग्न-निश्चय करूनि त्वरा पुण्यामाजी ठरविला

आपली मुलगी थोराच्या घरांत पडणार, हें समजतांच अहल्येच्या आईचा आनंद गगनांत मावेना. त्या अनंदांत ती म्हणाली—

---

१ सार्वभौम. २ पाणीदार.

### २५ ओव्या. [ जात्यावरील. ]

माझी अहल्या भाग्याची सून पटली सुभेदाराला
ज्यानें अमुच्या धनगराची जात चढविली नांवाला

ठरल्या प्रमाणें पुण्यांत पुढीलप्रमाणें लग्नसमारंभ थाटला गेला.

### २६ कटाव.

पुण्य पट्टणीं त्या लग्नाची[1], झाली तयारी सत्वर साची; गणति न करवे मंडपांची; बावन पागा श्रीमंताच्या; दुजा निराळ्या, हुजुरातिच्या, अन्य अन्य त्या सरदारांच्या; हजार हत्ती झुलूं लागला, छत्रपतीच्या वैभवनिधिला, वाटे तेव्हां पूरचि आला; भगवा झेंडा हत्तीवरती, जरी पटक्याला मुळीं न गणती, वाण, कैंच्यां[2] उंटावरती, दण दण दण दण नौबति झडती, अघाडीस शिंद्यांचें लष्कर, घायवर, भायटे नी पाटणकर; महाडिक, शिर्के, यादव, जाधव; पवार, माने आणि निंबाळकर; धुलप, चौगुले, चव्हाण, शितोळे; मोहिते, सावंत, गायकवाडी; नवर मुलाची धरिलि अघाडी होळकराच्या सरदारांनीं; मध्यभागिं वरपक्ष म्हणूनी; भंडारासम निशाण पिवळें, हलकाऱ्याच्या कमरेस शेले, मल्हारराव वरबाप सुभेदार, यशस्वी ज्याची ती तरवार; नागपूरचे राजे रघूजी, श्रीमंताची बहू मर्जी, वांडे, फांकडे वीर गाजी, पिछाडीस ते पंत प्रधान, नानासाहेब हर्षनिधान, गुणज्ञ पेशवे तसे गुणवान्‌ रास्ते, फडके; नी ढमढेरे; थत्ते, पारसनीस, परचुरे; रावआप्पा बळवंत मेहेंदळे, विंचुरकर; अभ्यंकर, भावे, पटवर्धनास किति वानावें; सुमंत, पानसे, सचीव, खासे; पंत प्रतिनिधि राहणी साधी; बुंदेले बोकील, गोखले, चंद्रचूड, मुजुमदार, काळे; भिडे, प्रभूणे खाजगीवाले; आणिक होते बहुत मिळाले, कुंभेरि, बुंदी, कोचिन, कोटा; झालवाड, जयपूर, उदेपूर, गोध्रा, झिंद, इदर, भावलपुर, नाभा, म्हैसुर, झांशि, बिकानेर वधूवरांच्या भोंवतालीं, बायांची ती गर्दी झाली: सवाष्ण कोणि न घरीं राहिली; कुणि अंबारिंत, कुणी पालखिंत, कुणी पायदाळीं, कुणि त्या गाडींत; वाजंत्र्यांचा बहुत कडाका, नायकिणीचे ताफे देखा, वरातिचा हा थाट ऐका, धन्य धन्य ती माय अहल्या, चवऱ्या तिजवर उढूं लागल्या, **दासगणूनें** नाहिं पाहिल्या, इतिहासांतिल गोष्टि ऐकिल्या, त्याच कवनामधें गोंविल्या, या समयीं त्या तुम्हांस कथिल्या. १

---

१ इ. स. १७३३. २ तरवारी.

२७ आर्या.

छत्रपतीच्या चरणीं नत[1] होतीं तीं वधूवरें पुढतीं
सादर[2] त्यां घे अंकीं साखर घालावया मुखीं नृपती

२८ पद [ चाल — हटातटानें. ]

सुभेदार त्या पाहुन कृतिला मुदित जाहला मनीं
आनंदाश्रु ढाळि लोचनीं धृ०
मी चाकर पायाचा माझीं मुलें अंकिं घेतलीं
भूप ना हा, आमुची माउली
वर्णिला जसा तो धर्मराज भारतीं
पुण्यश्लोकहि हा तसा कलिंत भूपति
पूर्णेंदुस आम्ही नक्षत्रें भोंवतीं
इतर दागिने आहों आम्हीं नृप त्यांतिल बिजवरा[3]
लाधला खरा चौकुनी चिरा १

त्या वधुवरांस छत्रपति आशिर्वाद देतात कीं,

२९ साकी

अष्टपुत्र सौभाग्यवती हारि करो अहल्ये ! तुजसी
शतायु होवो त्वत्पति ; सुखवा तुम्ही सुभेदारासी
माझ्या होळकरा वर्तन त्याचें ध्यानिं धरा

राजांनें दिलेला हा आशीर्वाद ऐकून, मल्हारराव :—

३० पद [ नृपममता रामा ]

हें आशीर्वच द्यायासी आहेत पुरोहित महिसी[4] भूपते! धृ०
परि सोच तुम्हांपासून पदालागून हात जोडून
इच्छितों कधिं ना हे नृप श्रेष्ठ नरभूषणा! येधवां १

' मग मी कोणता आशीर्वाद द्यावा ' असें छत्रपतींनीं विचारलें असतां मल्हारराव त्यांना पुढील आशीर्वाद देण्यास सांगतात.

१ नम्र २ आदर-प्रेमयुक्त ३ अलंकार विशेष ४ पृथ्वीवर

### ३१ पद [ झंपा ]

मरा रे मरा गादिसाठीं मरारे! जगीं वीर हो! कीर्ति रूपें उरारे! धृ०
धर्म सोडूं नका, राम जोडा सखा एकमेकांस द्या सुख विचारें
राजनिष्ठेपरी भूषण नसे; खरी वीर पुरुषा दुजी गोष्ट वारे १

पुढें अहल्येचा संसार थाटला गेल्यावर,

### ३२ पद [ चा. छक्कड. ]

पति ख्यालि खुशालिंत असे, तयाचा नसे विषाद बाईला
जी साध्वी अहल्या तिला
मालेराव, मुक्ताबाई संतति; पाही पतिच्या आज्ञेंत
सासूश्वशुर मानि दैवत
नित पुजी प्रभु बालकृष्णा, घाली प्रदक्षिणा माय तुळशीला
गणु म्हणे वानुं किति तिला

अहल्येला संसार–सुख फार दिवस लाभावयाचें नव्हतें. पुढें थोड्याच दिवसांनीं,

### ३३ आर्या [ गीति. ]

कुंभेरींच्या[1] युद्धीं खंडेरावास मृत्यु तो आला
जणुं का कौरव–कटकीं[2] अभिमन्यू बालवीर रणिं पडला

खंडेरावाच्या मृत्यूनें अहल्येवर दुःखाचा डोंगर कोसळला. मल्हाररावाची पुत्रशोकानें कंबर खचून गेली तेव्हां,

### ३४ श्लोक [ भु. प्र. ]

वदे पेशवा[3] 'शोकहा आवरावा असा मृत्यु युद्धांत वीरास यावा

तथापि सुभेदार शोकाकुल होऊनः—

खरें हें परी तो मला कां न आला यमा निष्ठुरा! कां वृथा बाळ नेला

सुभेदारांचें अहल्येवरहि पुत्रवत् प्रेम होतें. तिच्याकडे पाहून दिवस कंठावे म्हणून ते विचार करतात तोंच,

### ३५ दिंडी.

अहल्या ती जायास सती जेव्हां पुसायातें वडिलांस निघे तेव्हां
शोक सासुश्वशुरास फार झाला किती शब्दानें करूं वर्णनाला

---

१ २४ मार्च. १७५४ इ. २ सैन्यांत. ३ राघोबादादा.

सुभेदार (अहल्येला):— ३६ श्लोक [ मंदाक्रांता. ]

वृद्धावस्था खचित मजसी आण बाई मनांत
गेला खंडू वद धरिसि का तूंहि गे! तोच पंथ
माल्ू, मुक्ता वदतिल मुखें 'माय' ऐसें कुणाला
बोलावें गे! त्यजिन असुं, ही घाल भिक्षा अम्हांला.

३७ अभंग.

दशरथाच्या वेळेला सती गेली का कौसल्या
अभिमन्यू जातां हिरा सती गेली का उत्तरा
गेला त्याचा नित्य शोक हें तों अज्ञान मूलक
बाई पोथ्या वाचल्याचा करी उपयोग साचा

३८ ओवी

श्वशुर–वचन अहल्येसी विचारें मानलें मानसीं
[1]अवांतर होत्या सवती तिसी त्या सती गेल्या तेधवां

सुभेदारांना मुलाच्या जागीं आतां अहल्याबाईच होती. ते हळूंहळू राज्य–भार तिच्यावर सोंपवूं लागले. सोंपवलेलें काम बजावण्यांत तिचें चातुर्य दिसून आलें. एकदां त्यांना युद्धावर जाण्याचा प्रसंग आला त्या वेळीं तें अहल्येला समजतांच ती त्यांनाः—

३९ पद [ चाल- श्रीमंतपती. ]

[2]युद्धास एकटे जातां मज कां न बरोबर नेतां? धृ०
वृद्धापकाळ मामाजी! आलासे आपणा आजी
सोडून अशा समयाला
आम्ही न राहुं आपणाला
द्या मान झणीं विनतीला
कां कोंडुन गृहिं ठेवितां मज कां० १

४० पद [ चाल. लावणी. ]

मीं मदालसेची मागें मामाजि! गोष्ट ऐकिली
शतमुखी रावणाची त्या सीतेनें वाट लाविली

१ इतर. २ सरहद्द, बक्सार.

भामेनें नरकासुरा, धरुनि असि करां, गळा चरचरां
रणीं कांपीला मी करिन तसें न्या मला १
कांताहि वीर पुरुषाची रण धुरंधराची स्नुषा
मानिलें पुत्र तुम्हि मातें त्या गोष्टि विसरता कशा
एरव्हीं राहु पडद्यांत, परी युद्धांत खड्ग हातांत,
येउं झगडाया तरि होळकराच्या स्त्रिया

'प्रवासाचा त्रास अहल्ये! तुला सहन होणार नाहीं' असें सासऱ्यानें म्हणतांच तीः—

४१ ओव्या.

माझ्या गरीब मायबापाच्या सदनीं मीं पाथर्डीत
ऊन, वाऱ्याला सोशिलें नच त्याचें भय किंचित्

४२ आर्या [ गीति. ]

बेंक्सार सिरंदाच्या युद्धीं श्वशुरार्थ साह्य व्हायाला
गेली सती अहल्या अवला वीरापरी पहा प्रबला

याप्रमाणें कीर्ति संपादन करते न करते तोंच,

४३ दिंडी.

कालगतिनें सासुश्वशूर गेले अहल्येला त्यामुळें दुःख झालें
परि न डगमगली लवहि चालवाया राज्य—शकटा; किति थोर तिचा हिंय्य!

अशा स्थितींत देखील मुलाच्या—मालेरावाच्या विचित्र वर्तनानें ती सचिंतच होती- पुढें एकाएकीं,

४४ ओवी.

मालेराव दुष्टमति तोहि निमाला सत्वरगति

सुभेदारास वारस कोणीच नाहीं, अशा समजुतीनें कृतघ्न अशा

गंगोबा चंद्रचूडें केली युक्ति राज्य बुडविण्या होळकराचें

पोटगीला किती गांवें पाहिजेत हा त्याचा प्रश्न ऐकून अहल्याः—

४५ दिंडी.

मालु गेला वंशास कुणी नाहीं दैवें जैसें तैसेंच घडुन येई
पुत्र कामि का पांडवां तया जोगें एक उरला परि परिक्षिती मागें

असें बोलून तिनें तावडतोब सांगितलें कीं,

---

१ तरवार. २ स्त्री. ३ सून. ४ इ. स.१७६४. ५ शके १८६७. ६ धैर्य. ७ मार्च १७६२
८ गंगाधर यशवंत चंद्रचूड ( दिवाण. )

दा. क्र. २३२८

४६ ओवी.

जा तुकोजी बावासी वेरीं आणाया माझेपाशीं
त्या वसवून गादीशीं बंदोबस्त [illegible] ठेवणें

४७ आर्या [ गीति ]

परि हा विचार सतिचा गंगोबातें मुळीं नसे पटला
विदुर–विचारें जैसा शकुनी तो हस्तिनापुरीं विटला

आपला हेतु तडीस जावा ह्मणून त्यानें युक्ति योजून राघोबादादांस पुढील आशयाचें पत्र लिहिलें:—

४८ पद [ चाल - लावणी ]

भटवंशामधें जन्म घेउनी स्वस्थ राघोबा! कसे बसलां ?
प्रधानकीचीं वस्त्रें[2] माधवा, पठाण कां तुह्मि पंक्तीला ?
पोर कालचें माधव, त्याशी वंदन करितां दरबारीं
पोटावारी सदा रावता, असे कुठें का सरदारी ?
चाल– यासाठिं सांगतों युक्ति एक गोजिरी
तरवार धरुनि या! शीघ्र इंदुरावरी
बेवारस गादी होळकराची पुरी
एक अहल्या असे तिची परि भीति नको ती आपणांला
जिंकिल पंचानना[3] कुठूनी जरी माजला किति कोल्हा

४९ ओवी

दादांसी तें मामवलें सैन्य आपुलें जमा केलें
फौजेसहित पातले इंदूर शहर जिंकावया

ही वार्ता प्रथमतः अहल्येच्या दोघी नणंदा - हरकूबाई व उदाबाई - यांना समजली. त्या उभयतां तावडतोब अहल्येला जाऊन ह्मणाल्या कीं,

५० ओव्या.

काय वहिनी! बसलिस उगी ? नांव बुडतें सुभेदाराचें
डाव गंग्यानें साधिला पाळिलें पिलुं सर्पाचें ?
आले दादा फौजेसह गादी इंदुराची घ्यावया
तुज नेतिल पुण्यास पहा हरभरेच भरडावया

---

१ मल्हाररावाचा पुतण्या २ माधवराव पेशव्यांना ३ सिंहाला

तुझ्यामागें आह्मां नको नांव घ्यायाला मेण्याचें
काय सरलें पुण्य प्रभो! सुभेदार मल्हारजीचें

त्या इतकेंच बोलून थांबल्या नाहींत तर त्यांनीं अहल्येचा ब्राम्हणाविषयीं बुद्धिभेद करण्याचा प्रयत्न केला. त्या म्हणाल्या:—

५१ पद [ चाल — भूपतीखरें. ]

ब्राह्मणांवरी ठेविली वहिनि! तूं निष्ठा
परि तेचि येति वध द्यावयास तुज कष्टा
गाधिजें[1] हरिश्चंद्रासी छळियलें
वामनें बलिस पाताळीं दडपिलें
भृगुनेंच पहा विष्णूला ताडिलें
अशी निमकहरामी[2] जात मुळिंच विप्राची
ना होय सुखद संगती कांच कुइरीची[3]

या बुद्धिभेदानें तिच्या मनावर कांहींच परिणाम न होतां उलट ती ह्मणत्ये :--

५२ पद [ चाल - लावणी ]

नका निंदुं ब्राह्मणांस वन्सं! पाप तुह्मांला हें घडतें
लाथ भृगूची भूषण झाली त्या जगदीश्वर विष्णूतें ध्रु०
चौ वर्णांचे गुरू विप्र हे, त्यांस आदरें वंदावें
ब्रह्मद्वेषी जो नर होतो कुठेंहि तो नच सुख पावे
सुखी हरिश्चंद्र भूपती वसिष्ठामुळें
श्रीकांत बळींचे द्वारपाल जाहले
हे पुराणिंचे किति देउं तुह्मां दाखले
वाजिराव बल्लाळ धन्याच्या कृपेनेंच कीं होळकरा
सरदारी ही असे मिळाली, वैभव तुह्मि हें ध्यानिं धरा

५३ ओवी

सैनिकांसी पाहून अहल्याबाई करी भापण
तुह्मीं तयारी ठेवून दबा धरून वसावें

---

१ विश्वामित्रानें २ कृतघ्न ३ खाज उत्पन्न करणारी एक वनस्पात

युद्धाचा प्रसंग पाहून अहल्याबाईनें शिंदे, गायकवाड वगैरेना पत्रें धाडून कळविलें कीं,

५४ पद [ चाल- नृपममता० ]

धनी तुह्मां आह्मांला असती पेशवे छत्रपति नृपती सर्वदा
रघुनाथराव दादाचा धरुं नये पक्ष कुणिं साचा येधवां
दरबारीं, फितूरी करी, कपट अंतरीं, विषाची सुरी
जयाच्या हातीं ना प्रज्ञ[1] तयाला भजती क्षणभरी

हीं पत्र पावतांच इतर शिंदे, गायकवाड यांनींहि दादासाहेबांना कळविलें कीं,

५५ ओवी

आमच्याच बंधूवर तुम्हीं धरिली तरवार
तेणें आमची तिळभर कुमक[2] न मिळे तुम्हांतें

त्याशिवाय त्यांनीं दादासाहेबांना त्यांची चूक लक्षांत आणून देऊन हाहि इशारा दिला कीं,

५६ श्लोक [ इंद्रवज्रा ]

माता अहल्या खनि[3] सद्गुणाची दैना न दादा! करणें तियेची
मोठेपणासी न कदापि टाका शीला न घ्या लावुनियां कलंका

इकडे अहल्याबाईनें सौ. रमाबाईसाहेबांस देण्याकरितां म्हणून तुकोजीरावाच्या हस्तें पत्र देऊन पाठविलें.

५७ पद [ चाल-नृपममता रामा. ]

धनी थोर शिरावर असतां आहिं कां करावी चिंता व्यर्थचि
मर्जीचा पाहुनी रोख, हकीकत चोख, कथा निःशंक
दुबळि मी झाल्यें विश्वासीं तुमच्या बसल्यें येधवां

सौ. रमाबाईसाहेबांनीं पतीच्या कानांवर सर्व हकीकत घातली. माधवरावांनीं,

५८ ओवी.

वस्त्रें देऊन[4] तुकोजीसी दिलें धाडून इंदुरासी
आणि रघुनाथरावदादांसी पत्र लिहिलें येणें रीतीं

५९ पद [ चाल—मित्रा ममज. ]

भटवंशीं दादा! तुम्ही भीष्म शोभतां!
पळ काढिति यवन तुम्हां समरिं[5] पाहतां धृ०
उज्वल त्या कीर्तिस आणूं नका उणें

---

१ सूज्ञ. २ साह्य. ३ खाण. ४. १०जून. १७६७ई. ५ युद्धांत.

असुनि वयोवृद्ध तुम्ही अतुल शाहणे
पोराचें कौतुक तुम्हिं बसुन पाहणें
आहे जरि आपणांस मानमान्यता १

असें पत्र लिहून शेवटीं नम्रपूर्वक लिहिलें कीं,

६० आर्या. [ गीति ]

मी पेशवा प्रजेतें तुमच्या पुढती परी असे पोर
'हरि हरि' घरीं कराया मागें लावुन न द्या वृथा घोर

कदाचित् इतक्या लिहिण्याचाहि परिणाम न झाला तर शेवटीं निक्षून कळविलें कीं,

६१ पद [ चाल-नृपममता रामा. ]

होळकर सुभेदारांची, एकटी अहल्या साची वारस
म्हणुनियां, तिला अडथळा, कुणीं आणिला, तरी त्याजला
आम्ही शह देऊं धन, मान हिरावुनि घेऊं तत्क्षणीं

इकडे, तुकोजीराव गादीवर बसतांच अहल्येनें राघोबादादांना निरोप पाठविला कीं,

६२ पद [ चाल--लावणी. ]

भाउजी! वीर पुरुषाला नच निमकहरामी बरी धृ०
लावुनी झाड, तोडाया तरवार धरिलि का करीं?
चाकर आम्ही पायाचे, असुनि तूमचे, दैन्य आमचें
कराया आलां कुलकलंक तुम्हि उमगलां १
यन्नाम ऐकुनी वीर कांपत होते थरथरां
त्या अशा सुभेदाराची मी सून मनीं हें धरा
बेदम खाल हो मार, अथवा ठार, व्हाल साचार
इथुन पळ काढा ना अपेश-डोहीं बुडा २

अहल्या ( राघोबास ) :- ६३ आर्या [ गीति ]

यद्यपि आम्हांलागीं जरि राघोबा! रणीं तुम्हीं जिंतलें
कौतुक न, होय उलटें तुमच्या लागेल तरि मुखा काळें

कुणीकडूनहि डाव साधत नाहीं, हें पाहून राघोबा:—

---

१. काळजी. २. दम कोंडलाजाईपर्यंत. ३. पराभव--दुष्कीर्तीच्या डोहांत. ४. जिंकलें.

६४ आर्या [ गीति ]

आलों मी न लढाया, उलट अहल्ये! तुझ्या समाचारा
कां कीं सांप्रतकाळीं उरलों तुमच्च्यांत मीच म्हातारा

६५ दिंडी.

माळ[1] मेला म्हणुनीच दुखोऱ्याला येइं घेउन जनरीति इंदुराला
लढाईची ती भीति सोड सारी माय कधिं नच आपलीं पिलें मारी

६६ आर्या (गीति)

झाला समेट इकडे गंगोबा चंद्रचूड संन्यासी-
होउन अणेकाइच्या[2] गेला बुधहो! तदा पहाडासीं

यात्रमाणें तिचें राजकारण पटुत्व निवेदन केल्यानंतर तिच्या ठिकाणचें प्रजावात्सल्य कवि वर्णितात.

६७ पद (चाल–लावणी)

नेमाड मुलुख अडदांड[3] वहूत पहाड भिल्ल राहती
आल्यागेल्यास सदा लुटिती हो दरवडे धृ०
दरवडे घालिती बडे, भिल्लांच्यापुढें कधिं न धजती
त्यजुनी ग्राम लोक पळती हो दशदिशां १
दशदिशां जाहली दशा समर्थि त्या अशा ओस पडला
मुलुख नेमाड गणू वदला हो पहाकसा २

६८ आर्या (गीति)

तत्पारिपत्य करण्या गेला नेमाडचा सुभेदार
परि ना उपाय चाले, आडवितां वाळुनें नये पूर

भिल्लांचें पारिपत्य करणें योग्य नाहीं हें जाणून अहल्या त्या सुभेदारास म्हणत्ये:—

६९ दिंडी.

पत्र माझें हें भिलांप्रती द्यावें काय होतें तें मजसि निवेदावें
तीहि आहे माझीच रयत[4] सारी दुःख त्यांचें मजविना कोण वारी ?

७० पद (चाल–लावणी)

लेकरें रयत तीं सारीं त्यालागिं माय भूपती धृ०

---

१ मालेराव. २ पर्वतविशेष. ३ अडागी व दांगा. ४ प्रजा.

मग काय सुज्ञ शिशु कोठें जननिच्य.सर्वे भांडती
स्तनरूप राजसत्तेंत, सौख्य-पेय[1] सत्य तुम्हां प्रीत्यर्थ
असें तें प्यावें काढा न ढंग[2] नित नवे
मातेस शिशू[3] जरि प्यारे 'आड ये' त्यास कांपिती
जे येति सरळ मार्गानें ते अंकावरि खेळती
स्थळ जननि, हट्ट करण्यास, खड्ग धरण्यास, योग्य नाखास
कथीं आशि नीति गणु ह्मणे अहल्या सती

७१ ओवी.

'भिल्लैकवडी'[4] कर बसवुन केलें भिल्लांचें संरक्षण
तेणें आनंदलें मन मैनरूपासिंग[5]-वंशजाचें

आतां तिच्या अंगीं असलेल्या साधुत्वाचें महिमान वर्णन करितातः—

७२ आर्या. (गीति)

भागरथींत एक्या नौकेला थोर छिद्र तळिं पडलें
घाबरले नावाडी, सकल उतारू तसेचि गडबडले

महाराष्ट्रांतील मंडळी काशीस चालली असतां संकटांत सांपडतांच देवीचा धांवा करूं लागली.

७३ पद (चाल-उद्धवा शांतवन०)

हे साध्वि अहल्याबाई! या समया सादर[6] होईं जननिगे! धृ०
हीं तुझीं लेकरें सारीं कर देउनियां पुरि तारीं जननिगे!
जान्हवी काळ[7] ही झाली
अयि! नाव तळाला फुटली
आतां न अन्य कुणि वाली
झणिं महेश्वराहुनि येईं जननिगे!

लोक (गंगेला) :— ७४ श्लोक (शा. वि)

गंगे! तूं पदपद्मजा[8] परि मणी कंठीं अहल्या असे
पूज्याच्या[9] शिरिं नाचतेस नित तूं, ती त्यां[10] करीं घेतसे

---

१ दूध. २ चाळे. ३ मूल. ४ धारा. ५ भिल्लांतला प्रमुख. ६ प्रगट. ७ मृत्युरूप. ८ पदकमळापासून निघालेली. ९ पूज्य-शंकराच्या. १० शंकराला (पार्थिव)

गोडा सोडुनि खारटास विनयें भेटावया धांवसी
होसी स्वैरगती सदा, परि पहा नाहीं अहल्या तशी

लोक ( गंगेला ) :— ७५ पद (चाल—कधि तिला)

तिची आहे शपथ तुजला येउं न द्यावें संचित जल ... धृ०
हे वरुणा! करि करुणा, आतां ना करि दैना
त्यजुं नको सुगुण अपुला १

### ७६ भजन.

पुनीत कान्हो, मुक्ता, केरी, जनी पंढरीठाई रे!
तशी नर्मदा—तटीं होळकर देवि अहल्या बाई रे! १

### ७७ पद [चाल—भजन]

जय अहल्या माताकी जय होळकर आम्माकी धृ०
बुडने लागे बच्चे तेरे आवो आम्मा देवो हात
तेरे भरोसे हम चालत है, हो न किसीका घात १
शिवशंकरके लिंगार्चनपर हेत हमारे आम्माका
तारो अहल्येखातर शिवजी! पुण्य जननिका है बांका २
कहे दासगनु 'जय' कहतेही नाव झपाटे बंद चली
देवि अहल्या यही देणगी भारतको हि अमोल मिली ३

### ७८ ओवी.

महेश्वराकडे मुख करून नाचूं लागले लोक
काशीचे जन असंख्य कौतुक पहाया लोटले

महाराष्ट्रीय [ त्यांना ]:— ७९ पद [चाल—भल्या माणसा]

दक्कन् की वो रानि अहल्या भयि भगवतसे बहु प्यारी
'जय अहल्या' मूंसे बोलो ठाडी आम्मा महेश्वरीं धृ०
रघुवंशका नाम बढाया प्रभुनें आकर रघुकुलमें
वैसा होल्करका फैलाया नाम सतीनें दुनियामें १

---

१ समुद्रास. २ नात्रेत.

धन्य महेश्वर, धन्य होळकर, जिस वंशमे भयि आम्मा
उसका राखो मानमरातब दासगनू कहे सुख धामा! २

हा तिचा महिमा ऐकून काशीचे लोक आश्चर्य करूं लागले, तेव्हां महाराष्ट्रीयांनी त्यांना म्हटलें-

८०. पद [चाल-लावणी]

कलियुगिंच्या साध्वी स्त्रिया कान्हो, मुक्ता, गिरजा, जनी
मिरा, केरी, कर्माबाई रखू, सावंत्याची कामिनी
बिबी कबीरमहाराजाची भागु—तुकयाची कन्यका
त्यापरी अहल्याबाई राणी म्हणून वगळूं नका

८१ आर्या [गीति]

ऐसें कितिकि वेळां निज राज्या संकटांत रक्षियलें
बहुत मिळवुनी कीर्ती, हरिसेवेला शरीर लावियलें

भारतवर्षांतलीं किती तरी स्थळें अहल्याबाईची कीर्ति अजरामर करीत आहेत.!

८२ कटाव.

पंढरपुर, करविर, कोल्हापुर; औंढुंबर, वेरुळ, घृष्णेश्वर; त्र्यंबक, पुणतांबे, गोदातिर; परळी, औंढे, काशी, अवंती; गया, अयोध्या, तशी मथुरा ती; गोकुळ, वृंदावन, सुपुष्कर; हिंगलाज, गिरनार, डाकुर; सोमनाथ सोरटी, चांदवड; जेजूरी, मैलार, वणीगड; तुळजापुर, सोनारी, चौंढी; रामेश्वर, टोके, पाथर्डी; पुरी द्वारका, व्यंकटेशगिरि; ऐशा नानाविध क्षेत्रांतरिं, कीर्ति केली वर्नु कुठवरी; घांट कुठें, मंदीर बांधिलें; कुठें छत्र तें चालूं केलें; क्षेत्रस्थां भूमीदान दिलें; पांथस्थां पथिं विहिरि खोदिल्या; विमल यशाच्या ध्वजा लाविल्या; दासगणु म्हणे धन्य अहल्या! १

८३ आर्या [गीति.]

शक सत्राशेंसत्रा, श्रावण मासांत वद्य पक्षांत
जाय सती कैलासा चतुर्दशीला महेश्वरीं सत्य

१ अन्नसत्र. २ प्रवासी. ३ रस्त्यांत. ४ शुद्ध. ५ आगष्ट १३ सन् १७९५ ई.

८४ श्लोक [ भु. प्र. ]

सुभेदार, माल्हू, अहल्या, तुकोजी यशोजी, सदा रावमल्हार गाजी
हरीबा, तुकोजी, शिवाजी अशा या सवाई तुकोजी नृपातें नमूंया!

८५ पद [ चाल-किति मजेदार. ]

जय राज्ञि! होळकर कुलसति! देवि! अहल्ये! तुजसि नमो! धृ०
कीर्ति—पताका फडकति जगतीं
विमल यशा तव बुध जन गाती
विमला, सरला[1], जणुं का कमला
तूं ही गे या भूभागा अवतरलिस, मन चरितिं[2] रमो! १
सामदाम[3] दंडासी करुनी
होळकरशाही राक्षिलि जननि!
रीति, नीति, भक्ति, जगतीं
त्यांचि गे माते! आचरिली तच्छ्रवणें जन--पाप शमो! २
भूप सवाई राव तुकोजी
सांप्रत गादीवर रणगाजी[4]
तुझेंचि यश तें निशिदिनिं ध्याया
रहीं[5] गे! त्यापाठीं देवि! शतायुषी त्या करणें प्रभो! ३
नृप--महिषी[6] 'चंद्रावति' राणी
द्वितीय 'इंदिरा' सुहास्यवदनी
युवराजा त्या 'यशवंता' दे
आयु[7], माते! बाहू—बल तें होंचि मागें गणुदास विभो! ४

---

१. निष्कपटी. २. चरित्रांत. ३. राज्यचालविण्याच्या पद्धति. ४. रणयोद्धा. ५. रक्षण करण्यास सिद्ध. ६. पत्नी. ७. आयुष्य.

८९ पद [ चाल-शंभोशिव. ]

जयजय प्रभुवर जयजय शिवहर मलुराया! ध्रु०
मणिमल्लांतक बाणुप्रिया!
हयवाहन! हे श्रीसदया!
जेजुरिवासा! जगद्विलासा! हे अविनाशा! तव पाया १
नमन करित मी कलिमल[1] मम हर
भवसागरिं या तारीं झडकर
हेंचि विनवितों गणु पाया २

## संपूर्ण.

१. पाप.

# श्री जयदेवचरित्र *

कविवर्य

राजेजी महाराज कंधारकर

उर्फ

ऋक्मांगद–सुत

विरचित.

१ आर्या [ गीति. ]

श्री जयदेव कवीश्वर कृष्णप्रिय शांतही सुधाकरसा
ज्याची शांती पाहुनि निज चित्तीं वागवी सुधाक रसा

'पद्मावती' नामक अर्धांगीसह, जयदेव कवीश्वर 'तंदुबिल्व' गांवीं असतां, पुष्कळांनीं त्याचा अनुग्रह संपादन केला. त्यांत एक धनिक सावकार होता. आपल्याकडून सद्गुरूची कांहींतरी सेवा घडावी म्हणून,

२ आर्या [ गीति. ]

छात्रीं प्रार्थुनि नेला अन्य ग्रामासि तो पदा नमुनी
वसनाभरण बहु दिलें जें, तें घेउनि निघोचे दान मुनी

३ साकी.

सदन्न भक्षुनि निघतां मार्गीं दस्युचतुष्टय पाहे
असिधारक धनलोभी निर्दय पाहुनि चिंता वाहे

त्यांपासून उपद्रव न व्हावा या हेतूनें विचारकरितां प्रथम कांहीं मार्ग सांपडेना. शेवटीं,

४ साकी.

भगवच्चिंतन करितां करितां युक्ति मनीं आठवली
स्वासु–रक्षणा निमित्त विप्रें स्वमनिं योजना केली

ती योजना अशी कीं, ॥ **यस्माच्चप्रियमिच्छेततस्यब्रूयात्सदाप्रियं** ॥ म्हणजे ज्याच्यापासून आपलें प्रिय व्हावें असें आपण इच्छितो त्याच्याशीं नेहमीं गोड बोलावें.

---

* भक्तिविजय अ. २ १ चंद्राप्रमाणें. २. अतिशय प्रीति. ३. पृथ्वी. ४. शिष्यांनीं. ५. चार चोर. ६. तरवार बाळगणारे. ७. आपले प्राण रक्षण करण्याकरितां.

५ दिंडी.

असें स्वांतीं चिंतूनि पुण्यराशी म्हणे 'वत्सा! तूं कोण कुठें जासी?'
द्विजा म्हणती ते पुरुषोत्तमपूला अम्ही जातों कीं देवदर्शनाला

६ ओवी.

ऐसें ऐकून उत्तर सद्विज मनीं करी विचार
निर्भयपणें जवळ घर कैसें होईल मजलागीं?

७ पद [ चाल-ह्यातटानेंपटा. ]

अर्थ 'पंचदश अनर्थयुत' हा ठेवुं नये त्यागावा
देउनियां हळुं जावें गांवा धृ०
ऐसा विचार करुनी स्वमनीं त्यांस म्हणे बा! धांवा
घ्या वसनाभरणा बांधावा
सोपा सुंदर, कोपा न धरा स्वांतिं न माना कावा
उत्तम विवेक मम ऐकावा
शीघ्र जा तुम्ही, मागुनि हळुहळुं जातों मी स्वपुरासी
नामस्मरणें भवभय नाशी
घनःशाम श्रीकृष्ण दयाघन विभु द्वारकावासी नाम० १
तस्कर द्रविणा घेउनि जाती पुढें वहुत वेगानें
मोदा पावुनि गाती गाणें
द्विजही हर्षभरित होउनियां मार्ग क्रमित भजनानें
तंव त्या हांक दिली कुजनानें
'मिथ्या' म्हणती 'कनकभार हा झालासे कुमनानें
सत्वर येउनि घेईं नाणें'
ब्रह्मानंदीं निमग्न झाला ऐकेना वचनासी नाम० २

हांक मारुनहि जयदेवाकडून उत्तर नाहीं, असें पाहून तस्कर आपापसांत म्हणूं लागले.

कपटी नेदी उत्तर, जाउनि सांगेल नृपतीपाशीं

---

१ मनांत. २ स्थलविशेष. ३ पैसा. ४ लवाडा. ५ चोर.

राजा दंड करिल आम्हांसी
द्रव्यहि उलटें घेइल, मारुनि शेवटिं देइल फांसी
ना तरि होऊं कारावासी
यास्तव याच्या करचरणांसी तोडुनियां वनवासी—
केल्या पात्रचि होऊं सुखासी
ऐसें बोलुनि, निर्दय तोडिति त्याच्या करपादांसी   नाम० ३

८ साकी.

भगवद्भक्ता विपिनीं टाकुनि जाती ते परदेशा
खेदरहित जयदेव कवीश्वर चिंतितसे जगदीशा

याप्रमाणें अन्नपाण्यावांचून परमात्मचिंतनांत आनंदानें काळ कंठित असतां शरीरयातनांची व त्या देणाऱ्या तस्करांची त्याला आठवण सुद्धां राहिली नाहीं. एकदां,

९ पद [घनाक्षरी]

निघे मृगयेला भूप   मारी श्वापदां अमूप
द्विजा पाहुनियां, खूप   रुदितरूप जाहला

अत्यंत भयभीत होऊन तो 'क्रौंच' राजा,

१० पद [ता. त्रिवट]

गुरुला नमुनि वदे द्विज—देवा !   धृ०
मी दास तुझा प्रतिपाल माझा   करुनि काढिं भव—रेवां पासुनि   १
करपदविरहित कोणीं तुम्हाला   केलें, वदा कांहीं सेवा मजलागीं   २

हें राजाचें भाषण ऐकून कवीनें उत्तर दिलें,

शर्मद दुर्मद कोणी नसे अन्य   नर भोगी सुकृत ठेवा संतत   ३

हे वैराग्याचे उद्गार कानीं पडतांच राजा अत्यंत नम्र होऊन म्हणाला कीं,

'या यतींनीं'; नेत वसवुनि स्वपुरा   आणुनि ठेवित मेवा खाया   ४
रुक्मांगद—सुत   नम्रपणानें   म्हणतसे दोन घांस जेवा गुरुजी!   ५

---

१ कैदी. २ रानांत. ३ पुष्कळ. ४ रडणें. ५ जयदेव कवीला. ६ मल. ७ सुखदुःख—देणारा—सुखस्य दुःखस्य न कोऽपि दाता ८ रथांत.

राजानें जयदेव कवींला आपल्या घरीं नेल्यावर त्यांचा अनुग्रह घेतला. सद्गुरुनें राजाला संतांच्या सेवेचा व त्यांना इच्छाभोजनाचा राजमार्ग सांगितला.

११ पद [ चाल—हटातटानें. ]

श्री जयदेवाज्ञेनें चालवि राज्यभार तो राजा
लेशहि नसेचि मनिं तोरा[1] ज्या
सत्पुरुषाची सेवा निशिदिनिं करि दीनांच्या काजा
वसनाभरणें, सदन्न खा जा!
घालि वाढवा[2] बहु भक्तीनें व्यंजन[3] वटक[4]हि भाजा
तासे वाजति नौवत बाजा
नरवर--कीर्ति ऐकुनि श्रवणीं येती याचक[5]--राशी नाम० १

राजानें आरंभिलेल्या संतसेवेची व सर्वकाल चालू ठेवलेल्या अन्नसत्राची चोहोंकडे कीर्ति पसरली असतां एकदां,

१२ साकी.

जयदेवाचे करपदनाशक जे, बनती ते साधू
विचार करिती राजमंदिरा जाउनि निजहित साधूं

१३ दिंडी.

टिळे टोप्या घालिती तुळशिमाळा करें मुद्रा लाविती, बुका भाळा
हातिं वीणा, सुमृदंग, टाळ, झांजा करिति परमेश्वर—कथा परी वांझ[6]

याप्रमाणें साधूचा वेष घेऊन ते तस्कर—

१४ पद [ ता. त्रिवट. ]

सत्वर येती भूपती पाशीं ध्रु०
सत्तम[7] जाणुनि श्रीजयदेवें केलें नमन परांनी[8] स० १

जयदेवानें नमस्कार करितांच चोरांनीं ओळखिलें. त्यांना असें वाटलें कीं,

‘कर पद विरहित जयसुर[9] आम्हां हा परि देववि फांशी’ २
मोषक[10] मनिं चिंतन ऐसें परि तो देववि धनराशी ३
अरि[11] मित्रीं सम भाव जयाचा म्हणुनी सिद्धिहि दासी ४

---

१ अभिमान. २ वाढण. ३ चटणी. ४ वडा. ५ भिक्षुक. ६ निष्फळ. ७ श्रेष्ठ. ८ मित्रांस. ९ जयदेव कवि. १० चोर. ११ शत्रु--समःशत्रौचामित्रेच.

ऐसा संतत[1] भावचि व्हावा रुक्मांगद — तनयासी ५

जयदेवानें त्यांची योग्य बरदास्त ठेवण्यास सांगितलें. परंतु परिणाम काय होईल या भीतीनें ते चोर पंचपक्वान्नें खावून सुद्धां कृश होत चालले. हें काय कोंडें तें राजाला उमगेना. जयदेवास विचारतां त्यानें असें सांगितलें कीं हे अत्यंत विरक्त आहेत; त्यांना असल्या उपचाराची गरज नाहीं. तथापि त्यांची जेव्हां जाण्याची इच्छा होईल तेव्हां त्यांना जाऊं दे. हें वर्तमान तस्करांस कळतांच त्यांनीं जाण्याची इच्छा राजास कळविली. त्यावेळीं,

### १५ साकी.

कवीश्वर म्हणे भूपा! देईं या सांगात्यनुजीवी[2]
दस्यूपद्रव[3] होइल वाटे, कृपा असूं दे जींवीं

हें कवीचें भाषण ऐकतांच,

### १६ श्लोक.

श्री गुरोश्चरणौ नत्वा मद्त्राणाय राजराट्
चतुरोऽनुचरान् दत्वा स्वस्थचित्तो बभूवह

[अर्थ] श्रीगुरुंच्या चरणीं नमस्कार करून तो चतुर राजा त्या—वेषधारी तस्करांस—संतांस चोरांचा उपद्रव होऊं नये म्हणून त्यांच्या बरोबर दूतांना देता झाला. दूतांबरोबर ते वेषधारी चोर राजानें दिलेलें द्रव्य घेऊन आपल्या गांवीं जाण्यास निघाले.

### १७ कामदा.

मार्गीं चालतां दूत बोलती 'पाहुनी तुम्हां स्वामि डोलती
करिति गौरवा राजया हातीं उभयतां तुम्हां गा! कशी रति[4]'

हा दूतांचा प्रश्न ऐकून तेः—

### १८ पद [चाल—स्वार्थीऽऽऽप्रीतिमनु०]

तुह्मि परिसावें दूतहो! वचना ऽऽऽ धृ०
एकचि स्वामी[5] त्यांचा अमुचा एकस्थलिं अदना[6] १
स्नेहाचि अन्योन्याचा झाला गमन न निजसदना २
आह्मां ठावचि नाहीं[7] हा किर चौर्यासक्त मना ३

यानें चोरी केली तेव्हां,

१ नेहमीं. २ सांगाती+अनुजीवि-बरोबरसेवक (दे) ३ चोरांपासून भय. ४ परस्पर प्रेम कुठलें आहे? ५ राजा. ६ जेवणखाण. ७ खरोखर चोर आहेत हें ठाऊकच नाहीं.

चोरीस्तव या फांशी देतां आम्हींच केलें [1]मना' ४
ऋक्मांगदजा विस्मय वाटे ऐकुनि दुर्वचना ५

इतकेंच बोलून थांबले नाहींत तर,

१९ पद [ चा. हटातटानें. ]

पुन्हां सांगती, 'आम्हिच भूपा विनवुनियां [2]असु-दाना—
केलें, तोडविलें करचरणां
उपकारास्तव देशिक[3] तुमचा करवी बहु सन्माना
अमुचें वचन यथार्थचि माना'
ऐसें वदतां विद्युत्पातें शीघ्रचि पावति [5]कंदना
[6]कवलाचि झाले ते [7]यम-वदना
[8]महदवज्ञा नाश करितसे निश्चित आयुष्याची नाम० १

ते तस्कर असत्य भाषणानें पृथ्वींत गडप झाले, असें पाहून दूत घाबरले. काय करावें हें त्यांना सुचेना. शेवटीं;

२० कामदा.

दूत जाउनीं सांगती नृपा झालि साधुला ईश्वरी-कृपा
म्हणुनि ते पहा नाश पावले वृत्त जाहलें तें निवेदिलें

राजाकडून जयदेव कवीस हें सर्व वर्तमान कळण्यापूर्वी थोडीशी गुणगुण ऐकूं येऊं लागली. तें पूर्णपणें कळण्याकरितां ते विचारूं लागले:-

२१ श्लोक.

नारायणा कोप कसा अलारे समीप येऊन वदा मला रे!
ते सांगती देशिक--निंदनानें विद्युल्लता-पात शिरीं दणाणे

२२ श्लोक.

कळाले भूदेवा! मरण घडलें साधु पुरुषां
अहा देवा! कैसा विपरितपणा[9] साधु पुरुषां
'महत्त्राणालागीं[10] प्रतियुगिं सदा मी अवतरें'
वदोनी कां केलें निधनाचि[11] तुवां, ना उचित रे!

---

१ हरकत. २ प्राणदान. ३ गुरु. ४ वीज पडून. ५ यातना. ६ घास. ७ काळाच्या तोंडांतील. ८ थोरांचा अपमान. ९ त्रास. १० 'परित्राणायसाधूनां' ११ मरण.

मजकरितां साधूंना कां मरण आलें म्हणून कवीश्वरानें देवाला आळविण्याला प्रारंभ केला.

२३ पद [ चाल-माझा राम पाहिला काय. ]

देवा! [1]काशासाठीं कोप केला साधुवरी धृ०
असतां त्वद्भजनीं तत्पर मारुनि कां त्यां केलें दूर
मजला वाटतसे हुरहुर' म्हणुनी करपद आपटितसे १
ऐसा विलाप करुनी जनीं बोलत '[2]मुधाचि मम ही [3]जनी
घातुक होउनियां सज्जनीं भजनीं विन्मुख झालों कीं' २
शोकें वडवित कर, पद, घोटे झालें कर्म कसें [4]ओखटें
कर पद फुटले त्या [5]वहु नेटें वाटे ईश—कृपा करि त्या ३

शोकानें देवाला आळवितांना हातपाय आपटीत असतां एकाएकीं कवीश्वरांस हातपाय फुटलेले पाहून आश्चर्यानें,

नतशिर होउनियां भूपाल देशिक—चरणीं ठेवी भाल
रुक्मांगदतनया सांभाळ दीन—दयाळ गुरुराया! ४

प्रत्यक्ष राजा अनन्य भावानें शरण येत असूनाहि कवीश्वराचें अंतःकरण प्रभूकडे लागलेलें होतें.

२४ पद [ चाल—हटातटानें ]

कविनें सकृप होउनि केलें सजीव तस्कर—संता
चिंतुनि अंतरीं कमला—कांता
विकल्प कदापि नुपजे चित्तीं स्वप्निंहि[6] भक्तां शांता
मानिति वि[7]षयां जे सम वांता
'भूतदयापर होई' ऐसें उपदेशिति ते स्वांता[8]
तशाचि ज्यांचि [9]रहटे कांता[10]
नरवर कौतुक पाहुनि सविनय पुसतो महाराजासी नाम० १

---

१. कशाकरितां. २. व्यर्थ. ३. जन्म. ४. वाईट. ५. लौकर. ६. भ्रम. ७. वमनासारखें ८. मनाला. ९. वागे. १०. स्त्री—पद्मावती.

### २५ आर्या.

भूप म्हणे गुरुवर्या! त्वद्वृत्ताऽकर्णणीं[1] असे लोलें[2]
सांगा मज मी आहे त्वत्कारुण्याब्धिचाच[3] कल्लोल

याप्रमाणें राजानें इच्छा प्रदर्शित केली असतां,

### साकी.

समूळ वृत्ता सांगुनि देशिक ऐक म्हणे गा भूपा!
सर्वांभूतीं ईश्वर मानुनि करिं अनुकंपाऽमूपा[4]

शेवटीं कवि म्हणतातः—

### २७ दिंडी.

असे अधिकारी वैररहित थोडे संग ऐशांचा ईश-कृपें जोडे
म्हणुनि रुक्मांगद-सूनुलाहि[5] देई महत्संगावांचूनि अर्थ[6] नाहीं

## संपूर्ण.

---

१. तुमचें चरित्र ऐकण्यांत. २. आसक्त. ३. करुणासागराचा तरंग आहे. ४. अपार दया. ५. मुलगा. ६ फ

प्र. क्र. 2320
REFBK-0002328

## शुद्धिपत्र.

| पृ० | ओ० | शुद्ध. | पृ० | ओ० | शुद्ध. |
|---|---|---|---|---|---|
| ९ | २० | कन्येर्ग | २० टीप | ७ | पौर्णि १९६७ |
| १० | १ | नीच | २२ | २ | वनस्पति |
| ,, | १९ | प्रभूचें | २३ | ७ | पत्रे |
| १३ | १ | आनंदगावहि | २४ | १३ | गादीवर |
| १५ | ९ | म्हणत्येः– | २८ | | धन्य |
| ,, | १० | गाजविलें | ३२ | १७ | ...कर |
| १६ | १६ | पिछार्डास | ,, | | वीणा |
| ,, | २२ | झांर्शी | ,, | ,, ४ | खबार्डा |
| १९ | ५ | त्यजि न | ३३ | ,, ७ | सुखरूप |
| २० | २१ | कृतघ्न | ३७ | २० | तशीच |
| ,, टीप | ५ | शके १६८७ | ३८ | १० | अधिकारी |


## मासिक ) श्री साईलीला. ( पुस्तक.

पृष्ठसंख्या ४० वार्षिक वर्गणी रु. ३—६—० ट. ह. सह.

हें मासिक गेल्या चैत्र महिन्या पासून नियमित पणें दर महिन्यास प्रसिद्ध होतें. यांत शिर्डीचे ( ब्रह्मीभूत ) श्री **साईबाबा** यांच्या लीलांचा व बोधामृताचा संग्रह गद्य व पद्यरूपानें केला जात आहे. श्री साईबाबांच्या भक्तांनीं व इतर मुमुक्षूंनीं अवश्य संग्रहीं ठेवावें.

पत्ताः—गोविंद रघुनाथ दाभोळकर. श्रीसाईलीला कार्यालय.
५ सेंटमार्टिनरोड **वांद्रे** ( मुंबईनजीक ) बी. बी. सी. आय. रेल्वे.

## छापतआहे ) श्रीनामदेव ( नांवेंनोंदवा

### महाराजांचें काव्यमय चरित्र.

श्री संतशिरोमणी **नामदेव** महाराजांचें काव्यमय साग्र चरित्र रा. रा. **देवीदास लक्ष्मण महाजन** नांदेड, यांनीं लिहिलें आहे. तें फारच रसाळ व प्रासादिक असून ह. भ. प. श्रीमंत **दासगणू** महाराज ह्यांनींहि त्याची शिफारस केली आहे. आम्ही तें चरित्र छापवून प्रसिद्ध करीत आहोत. प्रति फारच नियमित निघणार असल्यामुळें आगाऊ नांवें नोंदविणारांसच पुस्तक मिळण्याचा संभव आहे. करितां खालील पत्त्यावर त्वरित नांवें नोंदवावींत.

**विठ्ठल लक्ष्मण खुबंध प्रोप्रायटर, "नामदेव प्रेस,"** शिंपी आळी,
११७० मेनस्ट्रीट **पुणे—लष्कर.**

## विष्णू . बी. भणगे. शिरूरकर कमिशन एजन्टस् पुणें शहर.

सुगंधी, स्टेशनरी, प्रिंटिंग, साईन बोर्डस्, रबर स्टँप्स्, फळफळावळ, औषधी व काष्ठौषधी वगैरे माल योग्य कमिशनवर पुरविला जाईल. त्याचप्रमाणें कोणत्याही कंपनीचे शेअर्स मिळवून दिले जातील. विशेष माहिती करितां पत्रव्यवहार करावा.

# विक्रीस तयार.

### श्री शिवरामस्वामीकृत.

| | | |
|---|---|---|
| श्री बोध वासरी. | [पद्य] | ८= |
| श्री शिव प्रदोषपूजा. | ( ,, ) | ८= |

### श्री सीतारामबुवा टेंबेकृत.

| | | |
|---|---|---|
| श्री वासुदेवानंदस्तोत्र | (संस्कृत.) | ८– |

### श्री ह. भ. प. दासगणूकृत.

| | | |
|---|---|---|
| श्री भक्तलीलामृत | (ओवीबद्ध अ. ४२) | १॥. |
| श्री संतकथामृत | ( ,, ६१) | २ |
| श्री गोदामाहात्म्य | (ओवीबद्ध अ. ३१) कागदी १।, कापडी | १॥. |
| श्री पांडुरंगस्तोत्र | (ओवीबद्ध) | ८= |
| श्री व्यंकटेशस्तोत्र | ( ,, ) | ८≡ |
| श्री शिष्यबोध | ( ,, ) | ८= |
| श्री चक्रीभजन | (पद्य.) | ८≡ |
| श्री ईशावास्य भावार्थ बोधिनी | (ओवीबद्ध) | ८≡ |

### न. रा. काहाळेकरकृत.

| | | |
|---|---|---|
| श्री दाजीमहाराज टाकळीकर-चरित्र | (गद्यपद्य) | ८≡ |

### दे. द. महाजनकृत.

| | | |
|---|---|---|
| श्री दत्तजन्म | (पद्य) | ८≡ |
| श्री दाजीमहाराज पंचपदी | [ ,, ] | ८– |
| श्री सिद्धारूढस्तोत्र | (ओवीबद्ध) | ८≡ |

### द. अ. सराफकृत.

| | | |
|---|---|---|
| श्री तुकाराम म. येहळेगांवकर-चरित्र. | | ।. |

### बाळगणूकृत.

| | | |
|---|---|---|
| श्री वासुदेवानंदस्तवनमाला | (चरित्रासह) | ।– |
| श्री वासुदेवानंद भजनलहरी | [अभंग] | ।– |
| श्री संतवारांचें भजन | [ ,, ] | ८≡ |
| श्री गोदामाहात्म्य | (ओवीबद्ध) | ८≡ |
| श्री दत्तस्तोत्र | ( ,, ) | ८– |
| श्री येसादेवीस्तोत्र | (श्लोक) | ८८॥. |
| श्री दत्तमानसपूजा | (ओवीबद्ध) | ८– |

सूचनाः—सर्व पुस्तकें एकदम मागविणारास ट. ख. माफ.

**पत्ताः— गणेश अनंत सराफ मु. पो. नांदेड (निजामस्टेट.)**